RNI No. 6153/57

समाचार
SAMACHAR

Volume - 75 | Issue- 69 | Marathi Daily | Friday 6/11/2026 | Pages - 6 | Price- Rs. 3





उठाठेव

– विवेक मेहेत्रे



ऑफलाईन चोरीत रिस्क असते म्हणून बॉस फॉरिनला चाललाय ! ऑनलाईन डिजिटल चोरीचा शॉर्ट – कोर्स करायला !!

व्याजमाफीसह मूळ रकमेवर २० टक्क्यांपर्यंत मिळणार सूट

थकबाकीदारांसाठी महावितरणची अभय योजना

समाचार/नगर-दि.६

दिवाळीच्या शुभमुहूर्तावर बिगर कृषी वीज ग्राहकांसाठी महावितरणने एक दिलासादायक निर्णय घेतला आहे. वीजबिलांच्या थकबाकीमुक्तीसाठी लघु व उच्चदाबाच्या कायमस्वरूपी व तात्पुरता वीजपुरवठा खंडीत झालेल्या बिगर कृषी वीज ग्राहकांसाठी अभय योजना आणण्यात आली आहे. दि. ६ नोव्हेंबरपासून १५ जानेवारी २०२७ पर्यंत या योजनेची राज्यभरात अंमलबजावणी केली जाणार आहे, असे महावितरणकडून



स्पष्ट करण्यात आले आहे.

या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे पात्र ग्राहकांच्या एकूण थकबाकीमधील संपूर्ण व्याज आणि विलंब आकार १०० टक्के माफ करण्यात येणार आहे. तसेच उर्वरीत मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा केल्यास ग्राहकांना २० टक्क्यांपर्यंत अतिरिक्त सवलत मिळणार आहे. यासह मागणीनुसार पुनर्जोडणी तात्काळ मिळणार आहे. दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत ज्या उच्च व लघुदाब वर्गवारीमधील थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित झाला आहे असे घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर बिगरकृषी (शेती व सार्वजनिक नळ पाणीपुरवठा योजना वगळून) ग्राहक तसेच (पान ३ वर)

सोने-चांदी वर्खाच्या मिठाईवर एफडीएची करडी नजर!

मुंबई, दि.६–अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सोन्याचा वर्ख आणि चांदीचा वर्ख असलेल्या मिठाईंचा दर्जा तपासण्याचे आदेश दिले आहेत. अमरावती जिल्ह्यातील २४ हजार रूपये किलोची सोन्याचा वर्ख असलेली मिठाई चर्चेत आली. त्यानंतर सोने आणि चांदी यांचा वर्ख असलेल्या मिठाईबाबत ग्राहकांच्या काही तक्रारीही आल्या, ज्यानंतर तुकाराम मुंढेंनी राज्यभरातल्या या मिठाईंवर करडी नजर ठेवण्याचे निर्देश अन्न आणि औषध प्रशासन विभागाला दिले आहेत.

सोन्याचा वर्ख खाणं हे काही आरोग्यासाठी हानिकारक नाही. पण दिवाळीच्या तोंडावर काही हलवाई आणि मिठाई (पान ३ वर)







संपादकीय

दिवाळी दारी उभी...

भारतीय सण-परंपरेत 'दीपावली' अथवा 'दिवाळी' या उत्सवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शरद ऋतूच्या निरोपाची आणि हेमंत ऋतूच्या आगमनाची चाहूल लागत असताना, आश्विन वद्य त्रयोदशी ते कार्तिक शुद्ध द्वितीया या काळात साजरा होणारा हा दीपोत्सव केवळ धार्मिक कर्मकांडापुरता मर्यादित नसून सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून मानवी जीवनाला समृद्ध करणारा एक महाउत्सव आहे. घराघरांच्या उंबरठ्यावर लागणाऱ्या छोट्या; पण तेजोमय पणत्या संपूर्ण जगाला एकात्मतेचा, आशेचा आणि नवसंजीवनीचा संदेश देतात. दिवाळीच्या प्रत्येक दिवसाला स्वतंत्र धार्मिक आणि पौराणिक संदर्भ लाभलेला आहे. या उत्सवाची पाळेमुळे हजारो वर्षे जुन्या भारतीय आख्यायिकांमध्ये रुजली आहेत. उत्तर भारतात दिवाळीचा थेट संबंध प्रभू श्रीरामांच्या अयोध्येतील पुनरागमनाशी जोडला जातो. चौदा वर्षांचा वनवास संपवून, लंकापती रावणाचा वध करून अधर्मावर धर्माचा विजय प्रस्थापित केल्यानंतर श्रीराम, माता सीता आणि लक्ष्मण अयोध्येत परतले, तेव्हा अयोध्यावासीयांनी तूप-तेलाचे अगणित दीप प्रज्वलित करून संपूर्ण नगरी उजळवून टाकली होती. तो दिवस म्हणजे कार्तिक अमावास्येचा दिवस मानला जातो, ज्या दिवशी आजही लक्ष्मीपूजन मोठ्या भक्तीभावाने केले जाते. देशात नरकचतुर्दशीचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. भगवान श्रीकृष्णाने अत्याचारी, प्रजाहिंसक असुर नरकासुराचा वध करून त्याने बंदी बनवलेल्या सोळा हजार स्त्रियांना मुक्त केले आणि समाजाला अन्यायाच्या पाशातून सोडवले. या विजयाचे प्रतीक म्हणून नरकचतुर्दशी साजरी केली जाते. धनत्रयोदशीच्या दिवशी आयुर्वेदाचे प्रवर्तक भगवान धन्वंतरी यांची जयंती साजरी केली जाते, जी आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करते. याच दिवशी कुबेर आणि लक्ष्मीची आराधना करून धनाचा आदर करण्याची शिकवण दिली जाते. बलिप्रतिपदेला, म्हणजेच दिवाळी पाडव्याला, वामन अवतारात विष्णूने दानशूर राजा बळीचे केलेले कल्याण आणि त्याला दिलेला पाताळातील राज्याचा आशीर्वाद याचे स्मरण केले जाते. शेवटी येणारी भाऊबीज किंवा यमद्वितीया बहीण-भावाच्या निःस्वार्थ प्रेमाचा, आपुलकीचा आणि संरक्षणाचा धागा अधिक घट्ट करणारी ठरते. थोडक्यात, दिवाळीतील प्रत्येक दिवस हा अनिष्टावर ईष्टाचा, असत्यावर सत्याचा आणि अंधारावर प्रकाशाचा विजय दर्शवतो. आपल्या संस्कृतीत 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही प्रार्थना अत्यंत मूलभूत मानली जाते. अंधाराकडून प्रकाशाकडे प्रवास करणे हाच दिवाळीचा खरा आध्यात्मिक उद्देश आहे. आपल्या अंतर्मनातील षड्रिपू असलेल्या काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या मर्यादांचा अंधार दूर करून तेथे सद्विचारांचा, ज्ञानाचा आणि प्रेमाचा दिवा लावणे, हे या सणाचे मर्म आहे. एकत्र कुटुंब, नातेवाइक, शेजारीपाजारी यांच्यात गोडधोड वाटून सामाजिक सलोखा आणि सुसंवाद वृद्धिंगत करणे हा या उत्सवाचा मुख्य सामाजिक उद्देश आहे. दिवाळी भारताच्या अर्थव्यवस्थेचे 'ग्रोथ इंजिन' मानली जाते. संपूर्ण वर्षात होणाऱ्या खरेदी-विक्रीच्या तुलनेत दिवाळीच्या काळात होणारी उलाढाल ही देशांतर्गत बाजारपेठेला प्रचंड गती देते. छोट्या किराणा दुकानदारापासून मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांपर्यंत प्रत्येकासाठी हा काळ सुगीचा ठरतो. दिवाळीच्या खरेदीत सोने, चांदी, हिरे यांसारख्या मौल्यवान धातूंपासून कपडे, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, वाहने, स्थावर मालमत्ता (रिअल इस्टेट) आणि गृहसजावटीच्या वस्तूंचा प्रचंड मोठा वाटा असतो. 'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेड' (कैट) च्या अंदाजानुसार, दर वर्षी दिवाळीमध्ये देशपातळीवर कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. यामुळे उत्पादन क्षेत्राला नवी उभारी मिळते, साठा संपून नवीन उत्पादनाची मागणी वाढते आणि वाहतूक, पॅकेजिंग यासारख्या संलग्न क्षेत्रांमध्ये रोजगार निर्माण होतो. या आर्थिक उलाढालीचे सर्वांत सुंदर वैशिष्ट्य म्हणजे यातील संपत्तीचे विकेंद्रीकरण. केवळ मॉल्स किंवा ई-कॉमर्स कंपन्याच नव्हे, तर रस्त्याच्या कडेला पणत्या, मातीची खेळणी, आकाशकंदील, रांगोळीचे रंग, फुले विकणारे लहान कारागीर आणि विक्रेते यांच्या हातालाही या काळात काम मिळते. या काळात शेतकऱ्यांचा नवा शेतमाल बाजारात आलेला असतो. त्यामुळे ग्रामीण अर्थकारणातही तरलता येते. अशा प्रकारे दिवाळी बाजारात अभूतपूर्व उत्साह आणि चैतन्य निर्माण करून संपूर्ण देशाला आर्थिक गती प्रदान करते. दिवाळीचा खरा आनंद हा केवळ स्वतःचे घर सजवण्यात आणि स्वतःच्या ताटात गोडधोड पदार्थ वाढण्यात नाही. आपल्या घरात आनंद साजरा करताना समाजातील उपेक्षित आणि दुर्बल घटकांच्या आयुष्यात प्रकाश कसा आणता येईल, याचा विचार करणे हेच भारतीय संस्कृतीचे मूळ तत्त्व आहे. 'सर्वे भवन्तु सुखिनः' ही भावना दिवाळीच्या सणात प्रत्यक्ष उतरली पाहिजे. या काळात आपण खरेदी करत असलेल्या पणत्या, आकाशकंदील किंवा मातीच्या वस्तू तयार करणाऱ्या कुंभार आणि कारागिरांच्या मेहनतीला योग्य मोबदला देऊन आधार देणे हे आपले कर्तव्य आहे. रस्त्यावर बसून किरकोळ वस्तू विकणाऱ्या आजी-आजोबांशी सौदेबाजी न करता सन्मानपूर्वक पैसे देऊन त्यांच्या घरातही सणाची चूल पेटू देणे ही खरी दिवाळी आहे. आपल्या सुबत्तेतील काही वाटा अनाथाश्रम, वृद्धाश्रम, कामगार किंवा घरकाम करणाऱ्या सहाय्यक वर्गाला गोडधोड, कपडे किंवा आर्थिक स्वरूपात देऊन त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणे म्हणजेच लक्ष्मीपूजन होय. ज्या दिवशी एका श्रीमंत व्यक्तीच्या घरासोबतच एका गरिबाच्या झोपडीतही आशेचा दिवा तेवतो, त्याच दिवशी दिवाळी खऱ्या अर्थाने सार्थक ठरते. आनंद हा वाटल्याने द्विगुणित होतो, हा दिवाळीचा सर्वात मोठा धडा आहे. हा आनंद साजरा करताना निसर्गाचे आणि पर्यावरणाचे अपरिमित नुकसान होणार नाही, याची काळजी घेणे आज काळाची गरज बनली आहे. धनत्रयोदशीच्या निमित्ताने यंदाची दिवाळी दारी उभी आहे. ती सामंजस्याचे मंगल पर्व घेऊन अवतरो, हीच शुभकामना.

अॅड. स्वाती जाधव यांना 'कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा' पुरस्कार



समाचार/नगर-दि. ६

अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन (ट्रस्ट) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा सन्मान सोहळा २०२६' मध्ये शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अॅड. स्वाती जाधव यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. पुणे येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी कलामंदिर, औंधगाव येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा उत्साहात पार पडला.

अॅड. स्वाती जाधव यांनी सामाजिक क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेत विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून आपले कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे भविष्यात अधिक जोमाने सामाजिक कार्य करण्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

हा पुरस्कार केवळ माझा वैयक्तिक सन्मान नसून, माझ्या प्रत्येक सुख-दुःखात खंबीरपणे साथ देणाऱ्या कुटुंबीयांचा, मित्रपरिवाराचा, सहकाऱ्यांचा आणि हितचिंतकांचा आहे. सर्वांच्या प्रेमामुळे, विश्वासामुळे आणि आशीर्वादामुळेच हा प्रवास शक्य झाला आहे, अशी भावना अॅड. स्वाती जाधव यांनी व्यक्त केली.

शहरात नवरंग पक्ष्याचे दर्शन

समाचार/नगर-दि.६

सध्या पक्षी सप्ताह सुरु असून याच कालावधीत दुर्मिळ असणारा इंडियन पिट्टा (नवरंग) या छोट्या आकाराचा पक्षी शहराच्या भरवस्तीत तसेच सावेडी उपनगरात दिसल्याने अहिल्यानगर शहरातील पक्षांची जैव विविधता ठळकपणे समोर आली आहे.पक्षी अभ्यासकांमध्ये यामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बुधवारी हा पक्षी तोफखाना भागातील ठाकूर गल्ली भागात खाली जमिनीवर पडलेला दिसल्यावर तेथील रहिवासी अभिजित कांबळे यांनी त्यास उचलून घेत या बाबत पक्षी अभ्यास व निसर्गमित्र मंदार साबळे यांना कळवले. साबळे यांनी त्यास तेथुन आणून त्याला दुसरीकडे निसर्गात मुक्त केले. या पक्षाची दुसरी नोंद पाईपलाईन रस्त्यावरील विद्या कॉलनीत झाली. तेथे राहणारे जेष्ठ पक्षी अभ्यासक प्रा.डॉ सुधाकर कुऱ्हाडे यांना त्यांच्या परसबागेत हा



पक्षी दिसला.या पक्षाला त्याच्या अंगावर दिसणाऱ्या विविध रंगांमुळे नवरंग असे नाव पडले असुन हा भारतातील सर्वात आकर्षक पक्ष्यांपैकी एक आहे.त्याचा आकार साधारण १६-१८ सेंमी असतो. महाराष्ट्रासह भारतातील अनेक राज्यांत हा आढळतो.जंगल,बागा आणि दाट झुडपांच्या परिसरात याचा वावर असतो. विशेषतः जमिनीवर पालापाचोळ्यात अन्न शोधताना हा अनेकदा नजरेस पडतो.

मुंग्या, वाळवी, लहान कीटक, अळ्या, गांडुळे तसेच जमिनीवरील लहान अपृष्ठवंशी प्राणी हे खाऊन हा आपली गुजराण करतो. हा भारतात अंतर्गत स्थलांतर करणारा पक्षी आहे.

पुढचं पाऊल

प्रस्तुत लेखात चारणाबद्दल थोडी विस्तृत माहिती पाहुयात. महाभारतकालीन सुतांचे चारण हे वंशज होत. ही चारण मंडळी महाकाव्यातील आख्यानांवर रचलेली गीतं गात असत. पुढे त्यांना राजाश्रयही मिळाला आणि कालांतराने सरदार-दरकदारांचीही कृपा लाभली. पौराणिक आख्यानांबरोबरच ते आपल्या आश्रयदात्यांच्या खऱ्या किंवा काल्पनिक पराक्रमांची आणि वैभवाची गीतेही गाऊ लागले. हे चारण एका दृष्टीने आजच्या रंगभूमीचे संस्थापक होते असं म्हणता येईल. प्रारंभी चारण एकटाच गाणी म्हणत असे, पुढे जोडीला आणि एक घेऊन जोडीने गाणी म्हणायला लागले. त्यांना लवकुश असे म्हणत. (वाल्मिकीने आपले रामायण' गाऊन दाखवण्यासाठी लव आणि कुश यांना शिकवून तयार केले होते, हे सर्वश्रुत आहे.) ही जोडी आख्यानातला संवादाचा भाग म्हणत असे. प्राचीन संस्कृत नाटकात आढळून येणाऱ्या धर्तीवरच या संवादांची रचना होती. गीतं आणि संवाद यांच्या साहाय्याने कथानकाचं निवेदन करण्याची ही कला सहाजिकच लोकप्रिय झाली.



संस्कृत भाषा पुढे सर्वसामान्य जनतेची भाषा राहिली नाही आणि जनतेला तिच्याबद्दल आस्था किंवा आदर राहिला नाही, तरीदेखील चारणांचा गीतगायनाचा हा कार्यक्रम सर्वाना आकर्षकच वाटत राहिला आणि चारण जमातीची जात दृढमूल झाल्यावर रंगभूमीचं एकूण स्वरूपही बदललं.

पूर्वीच्या काळात नाटकाचे प्रयोग देवळाच्या आवारात किंवा राजवाड्याच्या प्रांगणात होत आणि ते सुद्धा अगदी विशिष्ट उत्सवाच्या प्रसंगी किंवा राजेसाहेबांच्या लहरीनुसार केले जात. पण धंदेवाईक चारणाला फक्त अशाच प्रसंगाची वाट पाहात बसणे कसे शक्य होते? त्याचा रोजचा उदरनिर्वाह तर चालला पाहिजे ना? म्हणून प्रत्येक दिवस तो उत्सावाचाच समजे(अर्थात ज्योतिष्याने एखादा दिवस अशुभ वर्तवल्यास तेवढा वगळून), म्हणून तो आपला कार्यक्रम करण्यासाठी खेडोपाडी हिंडत असे. कधी शहरातही जाई. तिथं स्थानिक श्रीमंत आणि सामान्य लोकही त्याला बिदागी देत. त्याच्या प्रयोगाला तिथं राजवाड्याचं प्रांगण नसे किंवा देवळाचं आवारही मिळायची त्याला शाश्वती नसे. म्हणून तो गावातल्या चौकात किंवा मोकळ्या जागी आपलं रंगपीठ उभं करत असे. स्थानदृष्ट्या रंगभूमीच्या परंपरेचं हे पुढचं पाऊल होतं. एक धंदेवाईक चारण रामायणाची कथा श्रोत्यांना सादर करत आहे असे आपण समजू. कथेची भाषा संस्कृत आहे, पण प्रेक्षकांना कथानकाची कल्पना असली तरी संस्कृतच्या ज्ञानाच्या अभावी त्यांना त्यातले बारकावे समजत नाहीत. चारणाचं पिढीजात शिक्षण झाल्यामुळे त्याला मूळ संस्कृतचं थोडंफार ज्ञान आहे. मात्र प्रेक्षकांना नाटक समजलं पाहिजे आणि मनोरंजनही झालं पाहिजे असं तंत्र त्याने वापरलं पाहिजे. म्हणून संस्कृत नाटकात सूत्रधार जी कामगिरी करतो तीच चारणाला करावी लागते. संस्कृत नाटकात सूत्रधार सुरवातीलाच रंगभूमीवर प्रवेश करतो त्यावेळी बहुतेक वेळी त्याच्याबरोबर नटी असते. तिच्याबरोबरच्या संवादातून सूत्रधार प्रेक्षकांना नाटकाची कल्पना देतो. त्याशिवाय तो नटीला एखादं गाणं किंवा नाच करण्याची विनंती करतो. त्यामुळे प्रेक्षकांची उत्कंठा वाढू लागते. चारणाच्या गीतगायनात हीच नटी आपल्या कौशल्याने हातभार लावत असे.एकीकडे चारण गाणे म्हणतो आणि नटी त्याच्या जोडीला नर्तन करते हे दृश्य अनायास पहायला मिळत असे आणखी काय काय पहायला मिळे ते पाहुच पुढील लेखात.

- देवाशिष शेडगे

मो.८८०६०४४४८६



राशीभविष्य

- **मेष** : दिवसभरात महत्त्वाच्या घडामोडी घडतील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये. स्वमताग्रह टाळावा.
- **वृषभ** : हाती घेतलेली कामं मार्गी लागतील. आप्तेष्टांचं उत्तम सहकार्य लाभेल. जुन्या ओळखींचा लाभ घ्या.
- **मिथुन** : गेलेल्या संधी पुन्हा लाभतील. नव्या उमेदीनं कार्यरत रहाल. आर्थिक आमिषाबाबत सावध रहावं.
- **कर्क** : कारकिर्दीत नव्या वाटा दृष्टीपथात येतील. वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **सिंह** : कौटुंबिक प्रश्नात दिलासा मिळेल. आर्थिक बाबतीत ओढाताण राहील. वरिष्ठांशी मतभेद संभवतात.
- **कन्या** : मनाविरूध्द घटना संभवतात. स्थापत्य क्षेत्रात नव्या संधी लाभतील. वाहनांचा वापर जपून करा.
- **तूळ** : अचानक धनलाभ संभवतो. यांत्रिक-तांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील. कौटुंबिक समाधान लाभेल.
- **वृश्चिक** : मनातील इच्छा फलद्रुप होतील. भागीदारी व्यवसायात सावध रहावं. कलाकारांचा उत्साह वाढेल.
- **धनु** : अंगभूत कला-गुणांना वाव मिळेल. मुलांच्या प्रश्नांची चिंता राहील. विवाहाच्या प्रयत्नात ताण येईल.
- **मकर** : कारकिर्दीच्या क्षेत्रात तुमचं महत्त्व वाढेल. बोलण्यातून इतरांवर प्रभाव पडेल. स्पर्धेत यश मिळेल.
- **कुंभ** : मानसिक अस्वास्थ राहील. विवाहाबाबत तडजोडीची भूमिका ठेवावी. तांत्रिक क्षेत्रात प्रगती होईल.
- **मीन** : नव्या ओळखी कामी येतील. व्यवसायात अडचणी वाढतील. आर्थिक व्यवहारात नुकसान संभवतं.

ब्युटी टॉक — त्वचेचा कोरडेपणा दूर करण्यासाठी

थंडीत वातावरण कोरडं होऊ लागतं. बाहेरच्या शुष्कपणाचा आपल्या त्वचेवरही परिणाम होतो. म्हणूनच या दिवसांमध्ये त्वचेची अधिक काळजी घ्यावी लागते. थंडीत त्वचेतला ओलावा टिकवून ठेवणं गरजेचं असतं. यासाठी नेमकं काय करता येईल याविषयी...

❊ हुडहुडी भरवणाऱ्या थंडीत गरम पाण्याने आंघोळ करावीशी वाटते. मात्र खूप गरम, कडकडीत पाण्यामुळे त्वचा कोरडी पडते. त्यामुळे आंघोळीसाठी कोमट पाण्याचा वापर करावा. त्यातही चेहरा थंड पाण्याने धुवावा. यामुळे त्वचेतला नैसर्गिक ओलावा टिकून राहिल आणि रोमछिद्रंही बंद होतील. तसंच आंघोळीनंतर मॉईश्चरायझर लावायला विसरू नका. यामुळे त्वचा छान टवटवीत दिसेल.

❊ थंडीतही त्वचा तजेलदार ठेवायची असेल तर योग्य मॉईश्चरायझरची निवड करा. त्वचा तेलकट असल्यास लाईट मॉईश्चरायझर वापरा. त्वचा कोरडी असल्यास हेवी मॉईश्चरायझरची निवड करायला हवी.

(क्रमशः)

७ नोव्हेंबर — दिन विशेष

१८८८ : थोर शास्त्रज्ञ चंद्रशेखर वेंकटरमण यांचा जन्म.
१९९६ : नायजेरियाचे बोईंग ७२७ प्रकारचं विमान लागोसपासून आग्नेय दिशेस ४० मैलांवर कोसळलं. दुर्घटनेत १४३ ठार.
१९९६ : नासातर्फे मार्स ग्लोबल सर्वेयरचं प्रक्षेपण.
२००० : इराणने अमेरिकन वस्तूंच्या जाहिरातींवर बंदी घातली.
२००६ : प्रसिद्ध क्रिकेटपटू पॉली उम्रीगर यांचं निधन.
२०१३ : पाकिस्तानी तालिबानची सूत्रं मौलाना फजलुल्लाकडे सोपवण्यात आली.

टेक फन — कॉंप्युटरवरून करा कॉलिंग

मित्रमैत्रिणींनो, मायक्रोसॉफ्ट विंडोजवर कॉम्प्युटर किंवा लॅपटॉपवरून फोन करता येणं शक्य आहे.

❊ मायक्रोसॉफ्ट विंडोज १० वापरणाऱ्यांना लॅपटॉप आणि कॉम्प्युटरवरूनही फोन करता येतो.

❊ या फीचरचा वापर करण्यासाठी तुम्हाला फोनमध्ये 'युवर फोन ॲप' डाउनलोड करावं लागेल. हे ॲप मायक्रोसॉफ्टनेच तयार केलं असून अँड्रॉइड ७.० आणि त्यापुढच्या व्हर्जन्सवर ते डाउनलोड करता येईल.

❊ या अपडेटनंतर डेस्कटॉपमध्ये डायलर आणि कॉन्टॅक्ट्सचे ऑप्शन्स दिसतील. कॉलिंग करण्यासोबतच कॉलिंग हिस्ट्रीही कॉम्प्युटरवर बघता येईल. कॉल नाकारला म्हणजे रिजेक्ट केला तर संदेश पाठवण्याचा पर्यायही डेस्कटॉपवर दिसेल.

❊ या अपडेटमुळे स्मार्टफोन सतत तपासावा लागणार नाही. डेस्कटॉपवरच्या स्पीकर आणि मायक्रोफोनच्या मदतीने तुम्ही आरामात बोलू शकाल.

आरोग्यमंत्र — चालणं आरोग्यदायी

आजकाल हृदयविकार, रक्तदाब या बरोबरच लठ्ठपणाची समस्याही वाढीस लागली आहे. या व्याधींवर उपचारासाठी डॉक्टरांकडे गेल्यावर आवर्जून नियमित चालण्याचा सल्ला दिला जातो. खरं तर आरोग्य अबाधित राहण्याच्या दृष्टीने नियमित चालण्याचे बरेच लाभ आहेत. अशाच काही लाभांविषयी...



❊ शरीर तंदुरूस्त आणि चपळ राहण्याच्या दृष्टीने चालणं हा अत्यंत प्रभावी तसंच सोपा व्यायाम प्रकार आहे.

❊ सकाळी नियमित चालण्यामुळे या काळात मोकळ्या हवेतील ऑक्सिजनचा शरीराला पुरवठा होतो.

❊ हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक असलेलं 'डी' जीवनसत्त्व सकाळच्या कोवळ्या उन्हातून मिळतं. त्यामुळे सकाळच्या कोवळ्या उन्हात चालण्याचा व्यायाम अवश्य केला पाहिजे.

❊ चालण्यामुळे एकाच वेळी शारीरिक आणि मानसिक व्यायाम होतो. साहजिक या दोन्ही व्यायामांचे लाभ प्राप्त होतात.

❊ सततच्या कामामुळे तन-मनाला आलेला थकवा दूर करण्यासाठी चालण्याचा व्यायाम लाभदायक ठरतो.

❊ दररोज एक तास चालल्यास संधिवाताचा त्रास कमी होऊ शकतो, असं संशोधनातून दिसून आलंय.

❊ चालण्यामुळे पचनक्रिया सुधारते. तसंच मलबध्दतेसारखे, पचनाचे विकार कमी होतात.

भटकंती

या किल्ल्याच्या आसपासचं सौंदर्य नजरेत भरणारं आहे. माथेरानच्या विविध कोपऱ्यांमधून हा किल्ला दिसतो. प्रबळगड चढणाऱ्यांची संख्या बरीच मोठी आहे. हा ट्रेक टेकडीच्या पायथ्यापासून सुरू होतो. हा पायथा वरडोली गावापासून तीन किलोमीटर अंतरावर आहे. हा ट्रेक खूप कठीण नाही. मात्र वळणावळणाचे रस्ते असल्यामुळे जाणकार व्यक्ती सोबत असणं गरजेचं आहे. नवख्या ट्रेकर्सनी कोणाची तरी सोबत घ्यावी. फक्त ट्रेकिंगचा विचार करत असाल तर प्रबळगडला जायला काहीच हरकत नाही.

पंचांग

शनिवार, ७ नोव्हेंबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, अश्विन कृ. १३, चंद्रराशी : कन्या, नक्षत्र : चित्रा, योग : प्रीति, सूर्योदय ६.४४, सूर्यास्त ६.०१

फॉरवर्ड्स

मुज़रे सी होतीं हैं वफ़ादारी साहब...

लोग़ देखना चाहतें हैं, करना नहीं...!

करिअरवाटा — बना डेटा सायंटिस्ट

सध्याचं युग हे माहिती-तंत्रज्ञानाचं तसंच संगणकाचं आहे. साहजिक विविध क्षेत्रात संगणकाचा वापर बराच वाढला आहे. अशा स्थितीत डाटा स्टोरेजचं महत्त्व सर्वच जाणतात. आजकाल डाटा पेंटाबाईटमध्ये स्टोअर केला जातो. गुगल, अमेजन, मायक्रोसॉफ्ट, लिंक्डइन, फेसबुक आणि ट्विटरसारख्या डाटा स्टोअर करणाऱ्या कंपन्यांमध्ये डाटा सायंटिस्टची विशेष मागणी असते. सोशल नेटवर्किंग साईट विस्तारताहेत त्याबरोबर डाटा सायंटिस्टची मागणी वाढतेय. चांगला डाटा सायंटिस्ट आकडेवारीचा बारकाईनं अभ्यास करून योग्य निष्कर्ष समोर ठेवतो. डाटा सायंटिस्ट रिसर्चमध्ये माहितीचं विश्लेषण, संरक्षण आणि व्यवस्थापन या सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो. उपलब्ध माहितीचं आकलन आणि वर्गीकरण हे मुद्दे महत्त्वाचे ठरतात. डाटा सायन्सचे अभ्यासक्रम देशातल्या मोजक्या विद्यापीठांमध्ये उपलब्ध आहेत. उत्तम गणिती कौशल्य, संवाद कौशल्य, व्यवसाय नीट जाणून घेण्याचं कौशल्य, स्पर्धात्मक वातावरणात पुढं राहण्याचं कौशल्य, विश्लेषण कौशल्य, सांख्यिकी मॉडेल्स तयार करण्याचं कौशल्य आदी गुणांनी युक्त उमेदवार या क्षेत्रासाठी लायक ठरतात. हे शिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना सुरूवातीपासून गलेलठ्ठ पॅकेज मिळू शकतं. कारकिर्दीच्या या वाटेचा अवश्य विचार करायला हवा.



खेचाखेची — सुख

सरदार संतासिंग ज्योतिषाला : माझं लग्न कधी होणार ?

ज्योतिषी : तुझ्या नशिबात लग्नाचा योग नाही.

संता : का ?

ज्योतिषी : अरे, तुझ्या नशिबात अपार सुख लिहीलंय !

वेगळं काही

अमेरिकेतल्या नेब्रास्का प्रांतातला यू ट्यूबर जिमी डोनाल्डसन उर्फ मिस्टर बीस्टने दोन कोटी रोपटी लावण्याचा संकल्प केला आहे. या कामासाठी १४२ कोटी रुपयांचा निधी जमवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या उपक्रमाची सुरूवात झाली आहे. दोन आठवड्यांमध्ये जवळपास ९० कोटी रुपयांचा निधी जमवण्यात मिस्टर बीस्टला यश आलं आहे. हा एक विक्रमच आहे. मिस्टर बीस्टने सुरू केलेला हा उपक्रम ६०० पेक्षा अधिक यू ट्यूबर्स पुढे नेत आहेत. मिस्टर बीस्टने या कामासाठी 'आर्बर डे फाउंडेशन'सोबत सहकार्य केलं आहे. एका रोपट्यासाठी एक डॉलर नावाचा त्यांचा उपक्रम बराच लोकप्रिय झाला आहे. यासोबतच 'टीमट्रीज फंडरेझर'ची सुरूवात करण्यात आली आहे.

सौंदर्यसाधना — सुंदर मी होणार...

तुळशी विवाहानंतर लग्नसराई सुरू होते. विवाह हा प्रत्येकीच्या आयुष्यातला अत्यंत महत्त्वाचा प्रसंग असतो. विवाहात नवरीचं सौंदर्य खुलायला हवं. यासाठी सहा महिने आधीपासून ब्युटी पार्लरची महागडी पॅकेज घेतली जातात. पण हे सौंदर्य काही काळानंतर फिकं पडू लागतं. त्यादृष्टीने काय करायला हवं, जाणून घ्या.



❊ काही दिवस आधीपासून चेहरा नीट स्वच्छ करायला सुरूवात करा. यामुळे तेलकटपणा कमी होऊन ओलावा टिकेल. आठवड्यातून दोनदा स्क्रबिंग करा. यामुळे त्वचा आतपर्यंत स्वच्छ होते. मृत त्वचा निघून जाते. सौम्य स्क्रबमुळे त्वचेवरील छिद्रं मोठी होत नाहीत. ❊ थंडीत अनेकींना टॅनिंगची समस्या भेडसावते. यासाठी त्या अँटी टॅन ट्रिटमेंट घेतात. पण टॅनिंगचा त्रास टाळण्यासाठी थंडीतही सनस्क्रीन लावून बाहेर पडा. जेलवालं सनस्क्रीन लावा. घराबाहेर पडण्याआधी साधारण १० ते १५ मिनिटं सनस्क्रीन लावा. ❊ थंडीत त्वचा कोरडी पडते. हे लक्षात घेता त्वचेतला ओलावा टिकवून ठेवण्यासाठी दर तीन तासांनी चेहऱ्यावर मॉईश्चराझर लावा. लग्नाच्या तारखेच्या तीन ते चार महिने आधीपासूनच मॉईश्चरायझरचा वापर करायला सुरूवात करा.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

समाचार

शुक्रवार दि. ६ नोव्हेंबर २०२६ पान ३

अर्ज़ किया है...

शर्म्अ जिस आग में जलती है नुमाइश के लिए
हम उसी आग में गुम-नाम से जल जाते हैं

- क़तिल शिफाइ

हा शेर 'निःस्वार्थ त्याग' आणि 'प्रसिद्धीपराङ्मुखता' (प्रसिद्धीपासून अलिप्त राहणे) या मूल्यांवर प्रकाश टाकतो. जग ज्या गोष्टी कौतुकासाठी आणि स्वतःची प्रसिद्धी करण्यासाठी करते, त्याच गोष्टी जेव्हा एखादी संवेदनशील व्यक्ती कोणत्याही लाभाच्या किंवा नावाच्या अपेक्षेशिवाय केवळ कर्तव्यापोटी निमूटपणे सहन करते, त्या अथांग आणि निःशब्द वेदनेचे मार्मिक चित्रण या शेरात आढळते.

सुजय विखे – मोनिका राजळे चर्चेत; मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाकडे लक्ष

जिल्हा बँकेचे अध्यक्षपद भाजपाकडेच राहणार!

समाचार/नगर-दि.६

जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कामधेनू असलेल्या अहिल्याननगर जिल्हा बँक संचालक मंडळाच्या निवडणुकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली सहमती एक्सप्रेसने बाजी मारली. आता बँकेचे नवे पदाधिकारी निवडण्यासाठी येत्या गुरुवार दि. १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता संचालक मंडळाची सभा बोलवण्यात आली आहे. दरम्यान विखे – थोरात आघाडीत बँकेचे अध्यक्षपद भाजपाकडेच राहण्याची शक्यता आहे. अध्यक्ष – उपाध्यक्षपदाची नावे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निश्चित करणार असून भाजपाकडून अध्यक्षपदासाठी माजी खा. सुजय विखे आणि आ. मोनिका राजळे यांची नावे चर्चेत असल्याची माहिती आहे. दरम्यान उपाध्यक्षपदासाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे जावई रणजीत देशमुख यांची वर्णी लागण्याचीच चिन्हे आहेत.



अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील सहकारातील सर्व दिग्गज नेत्यांच्या सहमती एक्सप्रेसने मोठ्या बहुमताने बाजी मारली. संचालक मंडळाच्या २१ पैकी तब्बल १८ जागा विखे – थोरात आघाडीने जिंकल्या. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या गटाला २ तर नगर दक्षिणेचे खा. नीलेश लंके यांच्या रूपाने शरद पवार राष्ट्रवादीला एक जागा जिंकता आली. जिल्हा बँकेची सत्ता विखे – थोरात आघाडीच्या ताब्यात आल्यानंतर आता बँकेच्या नव्या पदाधिकाऱ्यांची जिल्ह्यात मोठ्या उत्सुकता आहे. नगर दक्षिणेचे माजी खा. सुजय विखे यांचे नाव अध्यक्षपदासाठी सुरुवातीपासून चर्चेत आहे. मात्र बँकेच्या अध्यक्षपदाचा निर्णय मुख्यमंत्री घेणार असल्याचे स्पष्टीकरण माजी खा. विखे यांनी यापूर्वीच दिले आहे. मिळालेल्या माहितीनुसार विखे – थोरात आघाडीत बँकेचे अध्यक्षपद भाजपाकडेच राहण्याची शक्यता आहे. भाजपाकडून अध्यक्षपदासाठी माजी खा. सुजय विखे यांच्यासह शेवगाव – पाथर्डीच्या आ. मोनिका राजळे यांच्या नावाचीही मोठी चर्चा आहे. याखेरीज कोपरगावचे ज्येष्ठ संचालक बिपिनराव कोल्हे यांचं नावही अध्यक्षपदासाठी चर्चेत आहे. बँकेचे नवे पदाधिकारी निवडण्यासाठी बँकेच्या नवनिर्वाचित संचालकांची सभा येत्या गुरुवार दि. १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता बँकेच्या सभागृहात बोलवण्यात आली आहे. दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बँकेच्या अध्यक्षपदासाठी कुणाचे नाव सुचवितात याकडे विखे – थोरात आघाडीच्या नेत्यांचे लक्ष लागले आहे.

पान १ वरुन

सोने-चांदी वर्खाच्या मिठाईवर एफडीएची करडी नजर!

व्यावसायिक चुकीचे दावे करत आहेत. यासंदर्भातल्या तक्रारी आमच्यापर्यंत आल्याने आम्ही अशा मिठाईबाबत तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच तुकाराम मुंढे असेही म्हणाले की चांदीचा वर्ख लावून जी मिठाई विकली जाते त्यातल्या वर्खावरची चांदी ही खरी नसते. जर तुम्ही तो वर्ख बोटांनी घासून पाहिलात तर तो गायब होतो. काही मिठाईंमध्ये बनावट ॲल्युमिनिअमचाही वापर होतो. आमच्याकडे तक्रारी आल्याने आम्ही दर्जाबाबत तपासणी करण्याचे ठरवले आहे.

थकबाकीदारांसाठी महावितरणची अभय योजना

दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत तात्पुरता वीजपुरवठा खंडित झालेले ग्राहक अभय योजनेसाठी पात्र आहेत. तसेच महावितरण डिस्ट्रीब्यूशन फ्रॅन्चाईजीमधील ग्राहकांनाही ही योजना लागू आहे.

या योजनेत एकूण थकबाकीमधील संपूर्ण व्याजाची आणि विलंब आकाराची रक्कम १०० टक्के माफ करण्यात येईल. मूळ थकबाकीची रक्कम एकाच वेळी किंवा हप्त्यांनी भरण्याची ग्राहकांना सुविधा आहे.

मंजूर भार २० किलोवॉटपर्यंत आहे, अशा ग्राहकांनी पुनर्जोडणीच्या वेळी प्रीपेड स्मार्ट मीटरचा पर्याय निवडल्यास मूळ थकबाकीमध्ये अतिरिक्त ५ टक्के सवलत दिली जाईल. या योजनेत सहभागी सर्व ग्राहकांसाठी पुनर्जोडणी शुल्क आणि लघुदाब ग्राहकांसाठी सर्व्हिस कनेक्शन शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येणार आहे. अभय योजनेसाठी अर्जाची प्रक्रिया ऑनलाइन ठेवण्यात आली आहे. महावितरणच्या ऑनलाइन पोर्टल किंवा मोबाईल ॲपद्वारे ग्राहक अर्ज करू शकतील, असे महावितरणने स्पष्ट केले आहे.

अर्ली बर्ड रिबेटचा फायदा

ही योजना सुरु झाल्यापासून १५ डिसेंबरपर्यंत मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा करणाऱ्या ग्राहकांना अर्ली बर्ड रिबेटचा फायदा देण्यात येईल. यात लघुदाब घरगुती व व्यावसायिक ग्राहकांना ३ वर्षांपर्यंत वीजजोडणी कायमस्वरूपी खंडित असल्यास १० टक्के तर ३ वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून कायमस्वरुपी खंडित असल्यास २० टक्के सवलत मिळेल. तसेच लघुदाब घरगुती व व्यावसायिक वगळून इतर सर्व लघु व उच्चदाब ग्राहकांना अनुक्रमे १० टक्के व १५ टक्के सूट मिळेल. लघुदाब ग्राहकांना ५० टक्के डाऊन पेमेंट भरून उर्वरित रकमेसाठी ६ समान व्याजमुक्त मासिक हप्ते तर उच्चदाब ग्राहकांना थकबाकीनुसार व्याजमुक्त ३ ते ६ हप्त्यांची सुविधा उपलब्ध असेल.

प्रभाग तेरामध्ये रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

मुंबईच्या धर्तीवर काँक्रीटचे रस्ते करु - आ.जगताप

समाचार/नगर-दि.६



शहरातील वाढती लोकसंख्या, वाहतुकीचा वाढता ताण आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांची गरज लक्षात घेऊन अहिल्यानगर शहरात पायाभूत सुविधांच्या विकासाला गती दिली जात आहे. याच अनुषंगाने प्रभाग क्रमांक १३ मधील ॲडव्हेंटिस चर्च ते हेमराज बोरा केटरर्सपर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला.

नगरसेवक अविनाश घुले,सुरेश बनसोडे ,अनिता शेटिया ,सुजाता पडोळे यांच्या विशेष प्रयत्नातून हे काम मार्गी लागले आहे.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहराचा सर्वांगीण आणि नियोजनबद्ध विकास करण्यासाठी विविध भागांमध्ये पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात येत आहेत. शहराचा विस्तार वेगाने होत असून, भविष्यातील गरजा लक्षात घेऊन विकासकामांचे नियोजन करणे आवश्यक आहे. मुंबईच्या धर्तीवर अहिल्यानगर शहरात काँक्रीट रस्त्यांचे जाळे निर्माण करण्याचा मानस आहे. काँक्रीट रस्त्यांमुळे रस्त्यांची टिकाऊ क्षमता वाढण्यासह नागरिकांना चांगल्या दर्जाचा प्रवास अनुभवता येईल..

नगरसेवक अविनाश घुले, नगरसेवक सुरेश बनसोडे यांनी मनोगत व्यक्त केले.

या शुभारंभप्रसंगी नगरसेवक अविनाश घुले, सुरेश बनसोडे, विपुल शेटीया, गोरख पडोळे, किरण व्होरा, डॉ. अतुल खालकर, डॉ. पराग कदम, सुनील शिंदे, प्रसन्ना शिंदे, हेमंत दिवटे, तरुण कराचीवाला, अतुल शिंदे, विक्रम कराचीवाला, भाना शिंदे, विश्वजीत बोरा, संगीता भंडारी, सरोजनी पोखरणा, नूतन कर्नावट, सतीश मिसाळ, अविनाश कराचीवाला, पास्टर सुधीर भोसले आदींसह परिसरातील नागरिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नगरमधील गवळी समाजाच्या प्रश्नी उपसभापतींना निवेदन

समाचार/नगर-दि.६

अहिल्यानगर येथील गवळी समाजाचे राज्य कार्यकारणी सदस्य बाळासाहेब खताडे यांनी मुंबई येथे राज्याचे विधानपरिषदेचे उपसभापती सचिन आहेर यांची भेट घेऊन त्यांना विविध मागण्याचे निवेदन सादर करून त्यांच्याशी चर्चा केली.

निवेदनात म्हटले आहे कि अहिल्यानगर गवळी समाजाने सन १९३१ सि.स.नं. ६९३१ स्मशानभुमीसाठी खरेदी केलेल्या मालकी हक्काच्या जागेवरील अतिक्रमण झोपडपट्टी काढणे बाबत अहिल्यानगर गवळी समाजाच्या स्मशानभूमीच्या जागेवर काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने एका व्यक्तीने वैयक्तिक नाव लावले आहे. त्याची सखोल चौकशी करुन त्या व्यक्तीवर सदर अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करुन नगर मधील गवळी समाजाला न्याय मिळवुन द्यावा. गवळी समाजाचे अ.नगर व बीड जिल्ह्याच्या सीमेवर श्रध्येचे पुरातन मंदिर ब्रम्हसिध्देश्वर सावरगांव, सि. सर्व्हे नं. १३४९ हा क्रमाक मुंतखाब फसलिष्य १३४९ नं. ४. (सावरगांव घाट) या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता जिर्णोध्दासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा ही विनंती. या मंदिरात महिन्याच्या प्रयेक अमावस्येला अहिल्यानगर मधून भंडाऱ्याचे नियोजण केले जाते व दर वर्षी श्रावण महिन्यातील तिस-या सोमवारी मोठ्या प्रमाणात भंडा-याचे नियोजन केले जाते. त्याठिकाणी मोठी यात्रा भरते. त्या यात्रेसाठी तीन राज्यातून महाराट्र, कर्नाटक, व गोवा इ. ठिकाणाहुन गवळी समाजाचे जवळपास २५/३० हजार भाविक लोक येतात. यासाठी आपण राज्यसरकारच्या माध्यमातुन निधी उपलब्ध करून द्यावा अशी विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

'मर्चंटस्'च्या सभासदांना ३ कोटी ५ लाखांच्या लाभांशाचे वाटप - चोपडा

समाचार/नगर-दि.६



अहमदनगर मर्चंटस को ऑप बॅंकेने सन २०२५ – २०२६ या आर्थिक वर्षासाठी जाहीर केलेला १५ टक्के लाभांश सभासदांच्या बँकेतील खात्यावर जमा करण्यात आला आहे. दिवाळीच्या मोठ्या उत्सव काळात हा लाभांश सभासदांना प्राप्त झाला आहे. उत्कृष्ट आर्थिक कारभाराची परंपरा कायम ठेवत बँकेने सभासदांना ३ कोटी ५ लाख रुपये लाभशांपैकी २ कोटी १० लाख सभासदांच्या खात्यात वर्ग केले आहेत तसेच बँकेत खाते नसलेल्या सभासदांनी आपला लाभांश त्वरित घेऊन जाण्याबाबत माहिती चेअरमन संजय चोपडा यांनी दिली.

चेअरमन संजय चोपडा यांनी सांगितले की, बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमलजी मुनोत यांच्या नेतृत्वाखाली बँकेने सभासदांची विश्वासाहर्ता कायम जपली आहे. अत्याधुनिक बँकिंग सेवा देतानाच काटकसरीने कारभार आणि सभासद हित याला नेहमीच प्राधान्य दिले जाते. स्पर्धेच्या युगात सर्वोत्कृष्ट डिजिटल बँकिंग सेवा दिली जाते. विविध कर्ज योजनांतून व्यापार, व्यवसाय, उद्योगांना चालना दिली जाते.

'मर्चंटस बँक जिथे, लक्ष्मी वास करे तिथे' हे ब्रीद सार्थ ठरवणारी वाटचाल बँकेचे वैशिष्ट्य आहे. याही वर्षी दिवाळी आधी बँकेत खाते असणाऱ्या सभासदांना लाभांश वितरण करण्यात आले आहे व ज्या सभासदांचे खाते बँकेत नाही अशा सभासदांनी आपले खाते लवकरात लवकर उघडून घ्यावे व लाभांश आपल्या खाती जमा करून घ्यावा तसेच ज्या सभासदांचे खाते खपेशिरींळींश असेल अशा सभासदांनी आपले खाते कार्यान्वित करावे असे आवाहन चेअरमन संजय चोपडा यांनी केले व सर्व सहकारी संचालक, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी, बँकेचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभल्याचे त्यांनी सांगितले.

विलीनीकरणाबाबत सुनील तटकरेंचा गौप्यस्फोट

अजित पवार हयात असते तर दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र दिसले असते

समाचार/मुंबई-दि.६



राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते प्रफुल पटेल यांनी गुरुवारी रात्री ब्रीच कँडी रूग्णालयात शरद पवार यांची भेट घेतली. ज्यानंतर शरद पवार यांनी आपण १० तारखेनंतर एकत्र बसू असे प्रफुल पटेल यांना सांगितले. याबाबत विविध चर्चा घडू लागल्या. दरम्यान सुनील तटकरे यांनी आता दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाबात भाष्य केले आहे. आज अजित पवार हयात असते तर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र दिसले असते, असे सुनील तटकरे यांनी म्हटले आहे.

तटकरे म्हणाले, अजितदादा हयात असताना विलीनीकरणाची चर्चा त्यावेळी नक्की झाली होती. विलीनीकरण कसे होणार तेदेखील त्यांनी सांगितले होते. अजितदादा असते तर १२ फेब्रुवारीला विलीनीकरण झाले असते. अजितदादांच्या प्रखर इच्छाशक्तीतून हे घडले असते. मी अजितदादांचा जवळचा सहकारी होतो. त्यामुळे मला हा विषय माहीत आहे असे सुनील तटकरे यांनी म्हटले आहे. अजित पवार यांचे २८ जानेवारीला अपघाती निधन झाले. त्यामुळे पुढे गोष्टी घडल्या नाहीत असेही सुनील तटकरे यांनी म्हटले आहे.

चौकशी करून दंडात्मक कारवाईची मागणी

वालुंबा नदीपात्रात अवैध वाळू उपशाचा आरोप

समाचार/नगर-दि.६



अहिल्यानगर तालुक्यातील भोरवाडी शिव ते खडकी शिवदरम्यानच्या सुमारे नऊ किलोमीटर परिसरातील वालुंबा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाची महसूल विभागामार्फत तातडीने चौकशी करून प्रत्यक्ष स्थळपाहणी व पंचनामा करावा, तसेच दोषींवर दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी तसेच राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी निवेदन पाठविले आहे.

समितीने दिलेल्या निवेदनानुसार, भोरवाडी शिव ते जाधववाडी-अकोळनेर परिसरापर्यंतच्या वालुंबा नदीपात्रात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा आणि वाळू तस्करी सुरू असल्याचा आरोप आहे. जेसीबी मशीन आणि अनेक डंपरच्या सहाय्याने नदीपात्रात खोलवर मोठमोठे खड्डे खोदून वाळू काढण्यात आली आहे. हा उपसा नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला बाधा पोहोचविणारा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या अनधिकृत उत्खननामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहावर परिणाम होण्याबरोबरच नदीकाठच्या शेतजमिनी, शेतकऱ्यांच्या विहिरी आणि बंधाऱ्यांना धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे समितीने म्हटले आहे. त्यामुळे संबंधित विभागाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक असल्याचेही निवेदनात नमूद केले आहे.वालुंबा नदीपात्राची महसूल विभाग, तलाठी आणि मंडळ अधिकारी यांच्या माध्यमातून तातडीने पाहणी करून अधिकृत पंचनामा करावा. तसेच ईटीएस तंत्रज्ञानाद्वारे उत्खननाची मोजणी करून प्रत्यक्ष किती वाळूचा उपसा झाला आहे, याची निश्चिती करावी. अवैध उत्खनन करणारे ठेकेदार अथवा संबंधित व्यक्ती आढळल्यास त्यांच्याकडून नियमानुसार दंड वसूल करून ही रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

कार्ड नसले तरी ३१ डिसेंबरपर्यंत सवलतीच्या दरात करता येणार प्रवास

एसटीच्या स्मार्ट कार्ड नियमात शिथिलता

समाचार/मुंबई-दि.६

एसटी प्रवासात शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला पुन्हा एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. एसटी महामंडळाच्या बसमधून शासनाच्या सवलतीत प्रवास करणाऱ्या महिला आणि ६५ ते ७५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सवलतीचे तिकीट आता स्मार्ट कार्डद्वारे दिले जात आहे. या योजनेच्या अंमलबजावणीबाबत अनेक अडचणी येत असल्यामुळे स्मार्ट कार्ड सक्तीबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रवासासाठी महिलांना बंधनकारक करण्यात आलेल्या नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्डची सक्ती एसटी महामंडळाने शिथिल केली आहे. ७ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत एनसीएमसी कार्ड नसले तरी एसटीच्या सवलतीच्या महिलांना सवलतीच्या दरात प्रवास करता येणार आहे. तांत्रिक अडचणी आणि ग्रामीण भागात महिलांपर्यंत पुरेशी माहिती न पोहोचल्याने महामंडळाने हा दिलासादायक निर्णय घेतला.

एसटी महामंडळाने एनसीएमसी कार्डची सक्ती ३१ डिसेंबरपर्यंत शिथिल केल्यामुळे आता नोंदणी न झालेल्या पात्र प्रवाशांनाही सवलतीच्या दरात प्रवास करता येणार आहे. १ जानेवारी २०२७ पासून एसटी प्रवास सवलतीसाठी एनसीएमसी कार्डची अट पुन्हा लागू राहणार आहे. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रवास सवलतीची नोंद ठेवण्यासाठी ही योजना राबवली जात असल्याचे म्हटले जात आहे.



ग्रामपंचायत बोरी, ता: अकोले, जि. अहिल्यानगर

जाहीर निविदा अंतर्गत खुली निविदा सूचना क्र. ०१/२०२६-२७

मा. प्रशासक, ग्रामपंचायत कार्यालय बोरी, ता: अकोले, जि: अहिल्यानगर हे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदारांकडून दोन लिफाफा पद्धतीने खालील जनसुविधा योजना सन २०२६-२७ अंतर्गत खालील कामासाठी निविदा मागवीत आहेत. निविदेचा कोरा नमुना व भरलेली निविदा स्वीकारण्याचा कालावधी दिनांक ०६/११/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजले पासून ते दिनांक १३/११/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालय, बोरी या ठिकाणी आहे.

अ.नं	कामाचे नाव	कामाची किंमत	योजनेचे नाव	निविदा फी	बयाना रक्कम	काम पूर्ण करण्याचा कालावधी	अधिकृत ठेकेदार वर्ग
१)	मौजे बोरी, तालुका: अकोले येथे स्मशानभूमी सुशोभीकरण करणे.	४,००,७५२/-	जनसुविधा योजना सन २०२६-२७	५९०/-	४००८/-	३ महिने	वर्ग ५ वरील

अटी व शर्ती : १) उक्त कामांबाबत निविदा अटी व शर्ती ई. बाबत सर्व तपशील संचामध्ये नमूद केलेला आहे. कोरा निविदा संच दि. ०६/११/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजलेपासून ते दि. १३/११/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने अथवा धनाकर्षाने भरणा करून उपलब्ध आहे. २) परिपूर्णरित्या भरलेला निविदा संच ग्रामपंचायत कार्यालयात दि. ०६/११/२०२६ रोजी सकाळी १०:०० वाजलेपासून ते दि. १३/११/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वा त्यापूर्वी सादर करता येतील. ३) निविदा शक्य झाल्यास दि. १६/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील. ४) निविदा संदर्भात सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीने राखून ठेवलेला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत बोरी ता: अकोले, जि: अहिल्यानगर

सभापती राम शिंदे अन् खा. नीलेश लंके यांची सहकारात दमदार एन्ट्री

जिल्हा बँकेत विखे - थोरात यांचे निर्विवाद वर्चस्व; डॉ. सुजय विखेंनी करून दाखविले!





(नंदकुमार सातपुते)

नगर-दि.२६- राज्याचे लक्ष लागलेल्या आणि आशिया खंडातील अग्रेसर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक संचालक मंडळाच्या निवडणुकीत जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखालील सहमती एक्सप्रेसने निर्विवाद वर्चस्व मिळविले. या निवडणुकीत जिल्हा बँकेवर भाजपाचे पर्यायाने स्वतःचे वर्चस्व मिळविण्याची पालकमंत्री विखे पाटलांची खेळी यशस्वी ठरली. त्यासाठी गेल्या काही वर्षात नगर शहरासह जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय झालेले नगर दक्षिणेचे माजी खा. डॉ. सुजय विखे यांचे या निवडणुकीसाठी सहकारातील सर्व दिग्गज नेत्यांना बरोबर घेत सुरू केलेले सहमतीचे राजकारण तितकेच महत्वाचे ठरले. यानिमित्ताने डॉ. विखे यांनी जिल्ह्यातील सहकाराच्या राजकारणाचा बारकाईने केलेला अभ्यास प्रकर्षाने पुढे आला. त्यातूनच विरोधकांच्या धारदार टीकेला नियोजनबद्ध प्रचारयंत्रणेने उत्तर देत जिल्हा बँकेची सत्ता बहुमताने जिंकण्याचा शब्द त्यांनी खरा करून दाखविला. दुसरीकडे विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी जिल्हा बँकेत स्वतःचे दोन संचालक निवडून आणत सहकारात पाय रोवले तर या निवडणुकीत नगर दक्षिणेचे शरद पवार राष्ट्रवादीचे खा. नीलेश लंके यांनी मिळविलेला एकहाती विजयही सर्वांनाच आश्चर्यचकित करणारा ठरला. सर्व विरोधक एकवटले असताना विखे – थोरात सहमती एक्सप्रेसच्या विरोधात दंड थोपटत आणि स्वतःची राजकीय प्रतिष्ठा पणाला लावत खा. लंके यांनी पारनेर सोसायटी मतदारसंघाची जागा आपल्याकडे खेचून घेतली. या परिस्थितीत जिल्हा बँक निवडणुकीच्या निमित्ताने सभापती शिंदे आणि खा. लंके यांचा सहकारातील दमदार प्रवेश जिल्ह्यातील मातब्बर नेत्यांना धक्का देणाराच ठरला आहे.

राजकीयदृष्टचा महत्त्वाच्या अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या तीन महिन्यापासून चर्चेत असलेल्या अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या सहमती एक्सप्रेसने बाजी मारली. यंदाच्या गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर या निवडणुकीसाठी जिल्ह्यातील सहकारातील सर्वच दिग्गज नेते विखे – थोरात यांच्या सहमतीच्या राजकारणात एकत्रित आले. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी विखे – थोरात सहमती एक्सप्रेसचे १० संचालक बिनविरोध निवडून आले. विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या गटाचाही एक संचालक बिनविरोध झाला. त्यामुळे विखे – थोरात सहमती एक्सप्रेसमध्ये सभापती शिंदे सहभागी झाल्याची चर्चाही रंगली. मात्र ती अल्पजीवी ठरली. सहमतीच्या राजकारणात अवघी एक जागा मिळाल्याने त्यावर समाधान न झालेल्या शिंदे यांनी आपले ३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरविले. नगर दक्षिणेचे शरद पवार राष्ट्रवादीचे खा. नीलेश लंके यांनी स्वपक्षातील इच्छुकांसह महायुतीचा घटक पक्ष शिवसेनेच्या नाराज नेत्यांना बरोबर घेत विरोधी पॅनल तयार केले. त्यासाठी शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या. खा. लंके हे स्वतः पारनेर सोसायटी मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरले. त्यामुळे ही निवडणूक मोठी चुरशीची ठरली. सहकार आणि जिल्हा बँकेतही वर्षानुवर्षे काम करणाऱ्या विखे – थोरात यांच्या सहमती एक्सप्रेसने या निवडणुकीत २१ पैकी १० जागा आधीच बिनविरोध जिंकल्या होत्या. १० जागांसाठी झालेल्या निवडणुकीत विखे – थोरात सहमती एक्सप्रेसने आणखी ८ जागा जिंकल्या. उर्वरित दोन जागांपैकी कर्जत सोसायटीची जागा सभापती शिंदे यांच्या गटाने तर बहुचर्चित पारनेर सोसायटीची जागा खा. लंके यांनी एकहाती जिंकली. या दोन्ही प्रतिष्ठेच्या लढतीत विखे – थोरात सहमती एक्सप्रेसला पराभवाचा सामना लागला.

जिल्हा बँक निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाल्यापासून भाजपाचे माजी खा. सुजय विखे यांनी या निवडणुकीत जाणीवपूर्वक लक्ष घातले. या निवडणुकीसाठी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी जिल्ह्यात सहकारातील प्रमुख नेत्यांच्या गाठीभेटी सुरू केल्यानंतर पालकमंत्री विखे आणि माजी खा. सुजय विखे यांनीही जिल्ह्यातील सहकारातील दिग्गज नेत्यांच्या भेटी घेत निवडणुकीची मोर्चेबांधणी सुरू केली. भाजपातीलच दोन प्रमुख नेत्यांनी स्वतंत्रपणे निवडणुकीची तयारी चालविल्याने त्याची राजकीय वर्तुळात मोठी चर्चाही झाली. जिल्ह्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक बिनविरोध करावी असे आवाहन ज्येष्ठ नेते माजी खा. यशवंतराय गडाख यांनी केले. माजी खा. सुजय विखे यांनीही त्यास दुजोरा दिला. त्यातूनच राजकारणात एकमेकांचे कट्टर विरोधक असलेले मंत्री विखे आणि माजी मंत्री थोरात यांचे जिल्हा बँकेसाठी एकत्रित आले. सहकारात राजकारण नको असे म्हणत




त्यांनी सहमतीचे राजकारण सुरू केले. सभापती प्रा. शिंदे आणि खा. लंके यांना त्यातून डावलण्यात आल्याची चर्चा झाली. शेवटच्या टप्प्यात सगळे एकत्रित आले पण त्यातून सर्व जागा बिनविरोधचा तोडगा निघालाच नाही आणि जिल्हा बँकेच्या १० जागांसाठी निवडणूक लागली. या निवडणुकीत विखे – थोरात सहमती एक्सप्रेसची सूत्रे माजी खा. सुजय विखे यांनी स्वतःकडे ठेवत प्रभावी प्रचारयंत्रणा राबविली. त्यातून विखे – थोरात यांच्या सहमतीच्या राजकारणाला मोठे यश मिळाले. जामखेडच्या बिनविरोध जागेसह कर्जतची जागा सभापती शिंदे यांच्याकडे गेली तर विखे पिता – पुत्रांसाठी प्रतिष्ठेची पारनेरची जागा विरोधी खा. लंके यांनी जिंकली. विखे – थोरात सहमती एक्सप्रेसला ३ जागा गमवाव्या लागल्या.

सभापती प्रा. शिंदे यांना २०२९ ची विधानसभा निवडणूक कर्जत – जामखेड मतदारसंघातून पुन्हा लढवून जिंकायची आहे. त्यासाठी त्यांना जिल्हा बँकेच्या कर्जत आणि जामखेड सोसायटी मतदारसंघातील विजय महत्त्वाचा ठरणार आहे. पारनेर सोसायटी मतदारसंघाची निवडणूक खा. लंके यांच्यासाठी पुढील राजकीय भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची होती. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत नगर दक्षिणेतून आश्चर्यकारक विजय मिळविल्यानंतर होमग्राउंड असलेल्या पारनेर विधानसभा मतदारसंघातून खा. लंके यांच्या पत्नी राणीताई लंके यांना अजित पवार राष्ट्रवादीच्या काशीनाथ दाते यांच्याकडून धक्कादायक पराभव पत्करावा लागला. त्यामुळे आताच्या जिल्हा बँक निवडणुकीत खा. लंके यांनी आपले सर्व राजकीय कसब पणाला लावले. पारनेर सोसायटी मतदारसंघातील निवडणूक हलक्यात न घेता स्वतः जातीने लक्ष देत निवडणुकीची सर्व सूत्रे हलविली आणि विजय मिळविला. त्यामुळे आगामी जिल्हा परिषद – पंचायत समिती निवडणुकीसाठी खा. लंके समर्थकांना मोठे बळ मिळाले आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने सभापती प्रा. शिंदे आणि खा. लंके यांनी दिग्गज नेत्यांची मोठी परंपरा असलेल्या जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात दमदार एन्ट्री केली आहे. जिल्हा बँक शेतकऱ्यांची कामधेनू. त्यामुळे या बँकेच्या सत्तेची सूत्रे विखे – थोरात यांच्या सहमती एक्सप्रेसकडे राहणार असली तरी बँकेच्या कारभारावर आमचे बारकाईने लक्ष राहील हेच सभापती शिंदे आणि खा. लंके यांनी निवडणूक निकालातून सत्ताधाऱ्यांना सूचित केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होते आहे.

ग्रामसेवकाचे कृत्य; मुख्याध्यापकाची आ. कर्डिलेंकडे तक्रार

डोंगरगण शाळेचा पाणीपुरवठा बंद

समाचार/नगर-दि.६

डोंगरगण येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याचे समोर आले आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाकडून शाळेचा पाणीपुरवठा बंद करण्यात आल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून,हा पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करावा,अशी मागणी शाळेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी आमदार अक्षय कर्डिले यांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार,डोंगरगण येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत सुमारे २८६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये बहुतांश विद्यार्थी शेतकरी,शेतमजूर व विटभट्टी कामगार कुटुंबातील आहेत.पिण्याचे पाणी बंद करण्याचा असा कुठलाही नियम नाही,



शाळेला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात होता.मात्र,ग्रामपंचायतीने हा पाणीपुरवठा बंद केल्यामुळे विद्यार्थ्यांसमोर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे निवेदनात म्हटले आहे. शाळेतील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता पिण्याच्या पाण्याची सुविधा बंद करणे योग्य नसल्याचे शिक्षकांनी निवेदनात नमूद केले आहे.

विद्यार्थ्यांना शुद्ध व पुरेसे पाणी मिळणे आवश्यक असून,ग्रामपंचायतीने शाळेचा पाणीपुरवठा तातडीने पूर्ववत सुरू करावा,अशी मागणी करण्यात आली आहे.आमदार अक्षय कर्डिले यांनी या प्रश्नात लक्ष घालून विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाला सूचना द्याव्यात,अशी अपेक्षा शाळा प्रशासनाने व्यक्त केली आहे. आता आमदार अक्षय कर्डिले या निवेदनाची दखल घेऊन विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कसा मार्गी लावतात,याकडे डोंगरगण ग्रामस्थ व पालकांचे लक्ष लागले आहे.पाणी पुरवठा पूर्ववत सुरु करण्यास सांगू असे आश्वासन आ कर्डीले यांनी दिले आहे



लाईक, डिसलाईक...

एखाद्या गोष्टीची सवय लागते कारण व्यक्तीने आधी ती ग्रहण केलेली असते, ग्रहण आनंदातही असते आणि डिसलाईक करणेही ग्रहणच असते. आपण एकदा लाईक किंवा डिसलाईक करणे सुरू केले की पुढची प्रक्रिया सुरू होते. लाईक केले की शरीरात डोपामाईन तयार होते आणि नंतर ते अजून मागितले जाते. डिसलाईक केले की शरीरात टॉक्सिन तयार होण्यास सुरुवात होते. मोबाईलची सवय लागली की तो दूर ठेवणे अवघड होते. मोबाईल स्क्रीनची लाईट डोळ्यांसाठी धोकादायक असते. लहान मुलांमध्ये सध्या दृष्टीदोष वाढत आहे. लाईक किंवा डिसलाईक वाढले की अनर्थ होतोच. दारू, जुगार, मोबाईलचे व्यसन जडले तर शेवट वाईटच होतो हे कळते. पण ते सुटत नाही. कारण ते व्यसन कितीही केले तरी तृप्ती होत नाही. खाण्याचे किंवा जगण्याचे

पथ्य पाळले तर समाधीने शांत मृत्यू येईल पण अपथ्य केले तर व्याधीने मृत्यू होईल. परमात्मा सांगतात, व्यसन लागायला वस्तू जबाबदार नसते तर व्यक्तीची मानसिकता जबाबदार असते. पाच इंद्रियांबरोबर परमात्मा मनाविषयी भाष्य करतात. मन का बेचैन होते? निगेटिव्ह विचार का येतात? मनासारखे नाही झाले की व्यक्ती अस्वस्थ होतो. परमात्मा सांगतात, कोणतीही परिस्थिती चांगली किंवा वाईट नसते. केवळ आपल्या टिट्युडमुळे आपण आनंदी किंवा दुःखी होतो. कोणीही लगेच राग द्वेष मुक्त होऊ शकत नाही. पण त्याचे गुलाम व्हायचे नाही. आजच्या काळात ब्युटी प्रॉडक्ट तयार करताना खूप हिंसा केली जाते आणि हेच प्रॉडक्ट सगळ्यांना आवडतात, आवडणे , नावडणे स्वाभाविक असले तरी त्याच्या किती आहारी जायचे हे आपल्यालाच ठरवायचे असते. स्वतःच्या जीवनात स्वतःचे मालक बनून जगता आले पाहिजे. जैन दर्शनने जगाला कर्म विज्ञान दिले आहे. आपण कर्म बांधणे सुरू करतो आणि नंतर ते आपल्याला बांधतात. आकाशात असंख्य परमाणु कण आहेत. ते एकत्र करून ग्रहण केले की बंध बनतो. सगळ्यात जास्त आयुष्य मनातील भ्रमाचे असते. भ्रम लवकर जात नाही. जसजसे भ्रम कमी होतात तसतसे कर्म बंध कमी होतात. फक्त हे भ्रम दूर करण्यासाठी स्वतःलाच प्रयत्न करावे लागतात. तुमच्या डोळ्याची शस्त्रक्रिया दुसरा करेल पण तुमच्या टिट्युडची शस्त्रक्रिया दुसरा कोणी करू शकत नाही. क्वालिटी आणि क्वांटिटीवरही काम केले पाहिजे. साखरेची क्वालिटी चहा गोड करते पण साखरेची क्वांटिटी सुद्धा योग्य प्रमाणातच लागते. हे सगळे ज्ञान दर्शन भगवान महावीरांची भक्ती केल्याने होते.

उपाध्याय प्रवर
पू.श्री.प्रवीणऋषिजी म.सा.

नगरमध्ये १२ नोव्हेंबरपासून शिवमहापुराण कथा सप्ताह

समाचार/नगर-दि.६

पुढील पिढीला केवळ संपत्तीच नव्हे, तर धार्मिक आणि नैतिक संस्कारांचाही वारसा मिळावा, या उदात्त उद्देशाने अहिल्यानगर शहरात १२ ते १८ नोव्हेंबरदरम्यान भव्य श्री शिवमहापुराण कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर आणि श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा सातदिवसीय आध्यात्मिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

दिल्लीगेट परिसरातील सातभाई मळा येथील डी. एड. कॉलेज मैदानावर दररोज सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत शिवमहापुराण कथेचे निरूपण होणार आहे. श्रीरामकृष्ण परमहंस सेवा



प्रतिष्ठान, केज (जि. बीड) येथील सुप्रसिद्ध कथाप्रवक्ते ह.भ.प. समाधानजी महाराज शर्मा आपल्या रसाळ वाणीतून शिवमहापुराणाचे निरूपण करणार आहेत.

कार्यक्रमाचे निमंत्रक तथा अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर आणि श्री साई द्वारका सेवा ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. धनंजय कृष्णाभाऊ जाधव यांनी शहरासह परिसरातील भाविकांनी आपल्या कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

गुरुवार, १२ नोव्हेंबर २०२६ : शिवपुराण महात्म्य, विद्येश्वर संहिता. शुक्रवार, १३ नोव्हेंबर २०२६ : रुद्र संहिता, सती-पार्वती खंड, शिव-पार्वती विवाह. शनिवार, १४ नोव्हेंबर २०२६ : रुद्र संहिता, कुमार खंड, गणेश व कार्तिकेय चरित्र. रविवार, १५ नोव्हेंबर २०२६ : रुद्र संहिता, शुद्ध खंड, अर्धनारी नटेश्वर, नंदी वर्णन. सोमवार, १६ नोव्हेंबर २०२६ : उमा संहिता, कैलास संहिता. मंगळवार, १७ नोव्हेंबर २०२६ : बारा ज्योतिर्लिंग महात्म्य. बुधवार, १८ नोव्हेंबर २०२६ : शिवमानस पूजा विधी, पंचाक्षर मंत्राची महिमा आणि कथा समापन.



शासकीय वैद्यकीय कॉलेजमधील डॉक्टर व कर्मचाऱ्यांचा सन्मान

समाचार/नगर-दि.६

अहिल्यानगर शहरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्याबद्दल आनंद व्यक्त करत स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने महाविद्यालयातील अधिष्ठाता, डॉक्टर व कर्मचाऱ्यांचा पुस्तक आणि गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अविनाश लांब , डॉ. राजेंद्र अंकुशे, डॉ. गणेश घुगे, डॉ. श्रीकांत रोकडे, डॉ. विष्णू कंकुटे, डॉ. प्रशांत दहिरे, डॉ. स्नेहलता येळंबकर, डॉ. सारिका अरगडे, डॉ. मनोहर शेळके, डॉ. ज्योती उगलमुगले, डॉ. आरती तांबे, डॉ. साक्षी मेहता, प्रतीक्षा सोळंके आणि प्रशासकीय अधिकारी नंदकुमार कोकरे, डॉ. दीपक बनसोडे, डॉ. गणेश नितूरकर (प्राध्यापक, न्यायवैद्यकशास्त्र विभाग), डॉ. निखिल गोडे यांचा पुस्तक व गुलाबपुष्प देऊन गौरव करण्यात आला.

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले की, अहिल्यानगर शहरात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू व्हावे, ही अनेक दिवसांपासूनची मनापासून इच्छा होती. आता शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होतील, तसेच सर्वसामान्य नागरिकांना आरोग्यसेवेच्या दृष्टीने मोठा आधार मिळेल, अशी अपेक्षा आहे.

समाचार वाचकांना नम्र सूचना

समाचार वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

अरुणोदय गो शाळेत भक्तिभावाने गोवत्स पूजन

गोशाळा गो संवर्धन कार्याला दिशादर्शक - आ. जगताप



समाचार/नगर-दि.६

वसुबारस निमित्त न्यू संकल्प स्मार्ट सखी ग्रुपच्या माध्यमातून येथे गोपूजन व विविध स्पर्धा घेण्यात आल्या आहे, त्यास महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. भविष्यात ही गोशाला गो संवर्धन कार्याला दिशादर्शक ठरेल, असा विश्वास आ.संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.

शेकडो देशी गाईंचे संवर्धन करणाऱ्या अरुणोदय गो शाळेचे वारुळाचा मारुती रस्त्यावरील नव्या प्रशस्त जागेत स्थलांतर झाले आहे. वसुबारस निमित्त या गोशाळेत गोवत्स पुजानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ.संग्राम जगताप, उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते मंत्रोच्चारात गो पूजन झाले. यावेळी महापौर ज्योती गाडे, अशोक पितळे, गो शाळेचे व्यवस्थापक मनीष फुलडहाळे यांच्यासह देणगीदार, महायुतीचे नगरसेवक व पदाधिकारी, विविध क्षेत्रातील नागरिक महिला मोठ्या संख्यने उपस्थित होते. गो पूजन करण्यासाठी महिलांनी म,ओठी गर्दी केली होती.

यावेळी नरेंद्र फिरोदिया म्हणाले, अरुणोदय गो शाळेत उत्कृष्ट काम होत आहे. येथील गो सेवा व संवार्धांच्या कार्याला सर्वांनी कर्तव्याच्या भावनेने सहकार्य करावे, असे आवाहन केले. प्रास्ताविकात मनीष फुलडहाळे यांनी गो शाळेची माहिती देऊन येथे सुमारे ३७० देशी गाईंचे संवर्धन होत असल्याचे सांगितले.

न्यू संकल्प स्मार्ट सखी ग्रुपच्या वतीने महिलांसाठी पारंपरिक उत्कृष्ट वेशभूषा व आरती थाळी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी ग्रुपच्या वैशाली चोपडा मोनिका मेहता स्मिता बोरा सारिका गांधी सोना भंडारी यांनी स्पर्धे चे नियोजन केले. यावेळी श्रीमती पार्वती जगताप, माजी नगरसेविका शितल जगताप, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, उद्योजक राजेश भंडारी, विलास कटारिया, आशिष पोखरणा, चेतन बळगट, मयूर कटारिया, विशाल पवार, संभाजी पवार, मंगेश खताळ, वैभव ढाकणे, मयूर कुलथे, नरेंद्र बाफना डॉ. हर्षवर्धन तंवर, निर्मल मुथा, जनक अहुजा, राजेंद्र छल्लानी, सत्यान गुंदेचा, संपत बारस्कर, अनिल मोहिते, सुजय मोहिते, प्रकाश भागानगरे, विपुल शेटीया, विकी जगताप, अजित जगताप, नगरसेविका पौर्णिमा गव्हाळे, वर्षा काकडे, गीतांजली काळे, मयुरी जाधव, सविता कांबळे, मोहित पंजाबी, महेश तवले, दत्ता गाडळकर, अलका मुंडाळा, हिंद सेवा मंडळाचे सचिव सोमतीलाल कोठारी, निर्मला भंडारी, कमल कोतकर, सुनिता गेनप्पा, अभय श्रीश्रीमाळ, अरविंद शिंदे, विलास कटारिया, मनोज कोतकर आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. यावेळी प्रसिद्ध गायक गिरीराज जाधव यांच्या भक्ती गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याचे सूत्रसंचालन प्रसन्न पाठक यांनी केले.

शेतकऱ्यांच्या मागण्यांवर कारखाना संचालक मंडळांनी आठवडाभरात निर्णय घ्यावा- विखे

समाचार/नगर-दि.६

जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांनी ऊस दर आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांबाबत बैठक घेऊन येत्या ९ नोव्हेंबरपर्यंत सकारात्मक निर्णय घ्यावा. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार साखर कारखान्यांतील वजनकाट्यांची तपासणी तातडीने करण्यात येणार असून, त्यासाठी तहसीलदार आणि वैधमापनशास्त्र विभागाच्या अधिकाऱ्यांचे संयुक्त पथक नियुक्त करण्यात येईल. या तपासणीवेळी शेतकरी अथवा शेतकरी संघटनांचे प्रतिनिधीही उपस्थित राहतील. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या तक्रारींचे प्राधान्याने निराकरण करण्यासाठी तक्रार निवारण केंद्र स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.



पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात अहिल्यानगर जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या सन २०२६-२% च्या गळीत हंगामातील ऊस दर आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी शेतकरी, साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींकडून विविध समस्या व मागण्या जाणून घेतल्या.

ऊस दर आणि शेतकऱ्यांच्या अन्य मागण्यांबाबत कारखाना व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घ्यावी. जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांच्या संचालक मंडळांनी स्वतंत्र बैठक घेऊन या प्रश्नांवर चर्चा करावी आणि ९ नोव्हेंबरपर्यंत निर्णय घ्यावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले. बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपमहापौर धनंजय जाधव, प्रादेशिक उपसंचालक(साखर) संजय गोंदे यांच्यासह ऊस उत्पादक शेतकरी, साखर कारखान्यांचे प्रतिनिधी आणि शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सावेडीकरांसाठी दिवाळी अंकाची मेजवानी



समाचार/नगर-दि.६

दिवाळीचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या सावेडी शाखेमध्ये दिवाळी अंकांच्या माध्यमातून आगळी वेगळी मेजवानी उपलब्ध करून देण्यात आली आहे .या दिवाळी अंकांचे वाचकांना वितरण उद्योजिका शिवानी देशमुख व स्मिता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. ठाकूर ,संचालिका प्रा ज्योती कुलकर्णी, संचालक कवी चंद्रकांत पालवे, गौरी जोशी, वाचक डॉ. धर्माधिकारी, अजित कटारिया ग्रंथपाल अमोल इथापे, सारिका देव आदी उपस्थित होते. उद्योजिका देशमुख यांनी यावेळी बोलताना मराठी संस्कृतीत दिवाळी अंकाचे मोठे योगदान असून सावेडी मधील वाचकांची दिवाळी या उपक्रमामुळे अधिक दैदिप्यमान होणार असल्याचे सांगितले.

डॉ. राजा ठाकूर यांनी याप्रसंगी बोलताना विचारांची संस्काराची आणि आत्मिक आनंदातून साजरी करण्यासाठी दिवाळी अंकांचे योगदान अमूल्य आहे. रसिक वाचकांना या दिवाळी अंकामुळे आगळीवेगळी मेजवानी मिळणार असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविक प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी केले. तर ग्रंथपाल अमोल इथापे यांनी आभार मानले. यावेळी रसिक वाचक सभासद व वाचनालयाचे कर्मचारी उपस्थित होते.



धनत्रयोदशीच्या शूभ मुहुर्तावर ए.एच. पोखरणा ज्वेलर्स दालनात सुवर्ण अंलकार खरेदीसाठी झालेली ग्राहकांची गर्दी.

ज्येष्ठ छायाचित्रकार राजू शेख यांचा आज 'रेडिओनगर' वर संवाद



समाचार/नगर-दि.६

पत्रकारिता क्षेत्रात वृत्तपत्र छायाचित्रकाराचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असते. एखादी घटना शब्दांत मांडण्यापूर्वी ती आपल्या कॅमेऱ्यातून जिवंत करणारा छायाचित्रकार हा पत्रकारितेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ असतो. अशाच छायाचित्रणाच्या माध्यमातून अनेक वर्षे पत्रकारितेची सेवा करणारे जुन्या पिढीतील ज्येष्ठ वृत्तपत्र छायाचित्रकार राजू शेख यांच्याशी 'रेडिओ नगर ९०.४ एफएम'च्या विशेष मुलाखतीत मनमोकळा संवाद साधण्यात आला आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, ६ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजता 'रेडिओ नगर ९०.४ एफएम'वर प्रसारित होणार आहे.

प्रेस फोटोग्राफर' या विशेष मुलाखतीच्या माध्यमातून राजू शेख यांनी आपल्या प्रदीर्घ जीवनप्रवासातील अनेक अनुभवांना उजाळा दिला. त्यांची मुलाखत ज्येष्ठ पत्रकार अजय धोपावकर यांनी घेऊन त्यांना विविध विषयांवर बोलते केले. वृत्तपत्र छायाचित्रणाची सुरुवात, त्या काळातील आव्हाने, बातमीसाठी घटनास्थळी पोहोचण्याची धडपड, योग्य क्षण टिपण्यासाठी घ्यावी लागणारी मेहनत आणि छायाचित्रकार म्हणून घडत गेलेला प्रवास अशा विविध विषयांवर त्यांनी आपले अनुभव मांडले.

आजच्या डिजिटल युगात मोबाईल, डिजिटल कॅमेरे, आधुनिक लेन्स आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे छायाचित्रणाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. या बदलत्या छायाचित्रकलेचा प्रवास आणि जुन्या काळातील अनुभव यांची सांगड घालत राजू शेख यांनी आपले विचार व्यक्त केले. ऑनलाइन रेडिओची मुलाखत एकण्यासाठी https://centova87.shoutcastservices.com/proxy/nagar90/stream ही लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे.



वाळकी येथे भानुदास कोतकर यांच्या आठवणींना उजाळा

समाचार/नगर-दि.६

ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी वाळकी (ता. नगर) येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी वाळकी ग्रामस्थांनी स्व. भानुदास कोतकर यांच्या आठवणींना उजाळा दिला. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तसेच पंचायत समितीचे सभापती म्हणून कार्यरत असताना त्यांनी नगर तालुक्याच्या विकासासाठी मोठे प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांतून अनेक गावांमध्ये विकासकामांना चालना मिळाली. नगर तालुक्याच्या प्रगतीसाठी त्यांचे महत्वपूर्ण योगदान होते, अशा शब्दात यावेळी श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी नारायणडोहोचे माजी सरपंच शंकरराव साठे, रावसाहेब भालसिंग, बाळासाहेब जाधव, जालिंदर सुपेकर, विजय भालसिंग, बब्बुभाई पठाण, जावेद शेख, अलिम शेख, महादेव कासार, संदीप बोठे, संकेत मुरूमकर, गोकूळ सुपेकर, विकास सुपेकर, राजेंद्र दळवी, शरद सुपेकर, संदीप पोटे, अनिल दळवी, राम सोनवणे, अमोल पाटील, अनिकेत कासार, प्रकाश वाघमारे आदी उपस्थित होते.

जिल्हा न्यायालयात रंगला दिवाळी स्नेहमेळावा व फराळ कार्यक्रम

समाचार/नगर-दि.६

आपल्या ज्ञानाने अनुभवाने आणि चांगल्या विचारांनी इतरांचे जीवन उजळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या कामामध्ये प्रामाणिकपणा, संवेदनशीलता आणि माणुसकीची ज्योत सदैव तेवत ठेवली पाहिजे. आपल्या आजूबाजूला असलेल्या एखाद्या गरजू व्यक्तीच्या जीवनात आनंदाचा एक दिवा लावता आला तर तीच खरी दिवाळी आपण समजूया. यासाठी आपल्या कुटुंबामध्ये आनंद, कार्यात सकारात्मकता आणि समाजामध्ये बंधुभाव वाढवण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करण्याचा संकल्प करू, असे प्रतिपादन प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांनी केले.



दीपावलीनिमित्त शहर वकील संघाच्या वतीने जिल्हा न्यायालयात स्नेहमेळावा व फराळाचे आयोजन झाले. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांच्यासह सर्व न्यायाधीश, वकील व कर्मचारी उत्साहात सहभागी झाले होते. यावेळी जिल्हा न्यायाधीश राजेश गुप्ता, जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, शहर वकील संघाचे अध्यक्ष ॲड.कृष्णा झावरे, सेन्ट्रल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.फारूक शेख, उपाध्यक्ष ॲड.भाऊसाहेब घुले, सचिव ॲड.विनोद शेटे, ॲड.अमोल अकोलकर, ॲड.सारिका झरेकर, ॲड. प्राजक्ता करांडे यांच्यासह वकील संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात ॲड.जय भोसले यांची महाराष्ट्र गोवा बार कॉन्सिलच्या शिस्तपालन समितीवर निवड झाल्याबद्दल तसेच ॲड.विक्रम वाडेकर यांची सन फार्मा माध्यमिक शाळेच्या विश्वस्त पदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश शिवाजी कचरे यांच्या हस्ते सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

प्रास्ताविक ॲड.कृष्णा झावरे यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. युवराज पाटील यांनी केले. ॲड.भाऊसाहेब घुले यांनी आभार मानले. यावेळी सुरेश भोर, रनजीत गोरे, रजनंदिनी पुंडे, ऐश्वर्या काळे, सतीशचंद्र सुद्रीक, साहेबराव चौधरी, नवनाथ गर्जे, सौरभ काकडे, योगेश काळे, हेमंत कराळे, धनंजय वाघ, लक्ष्मण कचरे, प्रज्ञा उजागरे, अनिता दिघे वकील उपस्थित होते.



ब्ल्यू डायमंडमधील विद्यार्थ्यांचा संकल्प

फटाके न वाजवता गरजूंना मदत

समाचार/नगर-दि.६

वडगाव गुप्ता येथील ब्ल्यू डायमंड स्कूलमध्ये प्रत्येक वर्षी राबविल्या जाणाऱ्या नवनवीन उपक्रमासोबत विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती, प्रेम, परिस्थितीची जाणीव या मूल्यांची रूजवणूक करण्यासाठी याही वर्षी इ.९ वी चे विद्यार्थी व शिक्षक यांनी स्कूलचे प्राचार्य व उपप्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली आनंदऋषी अपंग विद्यालयास भेट देऊन तेथील अपंग विद्यार्थ्यांसोबत दीपावली साजरी केली.

विद्यार्थ्यांनी अपंग गरजू विद्यार्थ्यासाठी मिठाई, दिवाळी फराळ, बिस्किटे, दैनदिन उपयोगी वस्तू , किराणा, तसेच मुलीसाठी ज्वेलरी, मेहंदी कोन अशा वस्तू आणल्या होत्या. या सर्व वस्तू अपंग गरजू विद्यार्थ्यांना दिल्यानंतर तेथील मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला .

अपंग मुलांची परिस्थिती पाहून उपस्थित सर्वच विद्यार्थ्यांची मने भरवून गेली. आपल्याजवळ जे आहे, त्याबद्दल काही तक्रार न करता आपण समाधान मानावे, असे विचार विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. सोबतच आपण स्वतः दिवाळीमध्ये फटाके न फोडता प्रदूषणमुक्त दीपावली साजरी करण्याचा व त्या खर्चाच्या बदल्यात एखाद्या गरजू मुलांना मदत करण्याचा संकल्प स्कूलमधील विद्यार्थ्यांनी केला.

रोटरी क्लब नगरचा 'स्वर दीपावली' कार्यक्रम दिमाखात

रोटेरियन्सच्या संगीतमय सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध

समाचार/नगर-दि.६

सध्याच्या धकाधकीच्या आणि व्यावसायिक युगात माणसामाणसांतील दुरावा वाढत असताना, रोटरी क्लब अहिल्यानगरतर्फे आयोजित 'स्वर दीपावली' या सांस्कृतिक समागमाने उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला. दीपावलीच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमात रोटरी क्लबचे सदस्य व त्यांच्या कुटुंबीयांनी संगीताच्या माध्यमातून आपलेपणा, जिव्हाळा आणि माणुसकीचा सुरेल संगम घडवून आणला. हा सोहळा अत्यंत दिमाखात पार पडला. अहिल्यानगर रोटरीचे अध्यक्ष सुहास क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली या संपूर्ण कार्यक्रमाचे सुरेख आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात सादरीकरण करणारे सर्व गायक-गायिका हे व्यावसायिक कलाकार नसून रोटरी क्लबचेच सदस्य होते.



केवळ गाण्याची आवड असणाऱ्या नवशिक्या कलाकारांना सुरात बसवून त्यांच्याकडून दर्जेदार सादरीकरण करून घेणे हे आव्हानात्मक काम ऋतुजा पाठक व देवदत्त पाऊलबुद्धे यांनी लीलया पेलले.मैफिलीत सदस्यांनी सादर केलेल्या विविध गीतांनी रसिकांना खिळवून ठेवले: डॉ. सुधा कांकरिया आजारी असतानाही अत्यंत भावपूर्ण सुरात 'अच्युतम केशवम' आणि 'देहाची तिजोरी' ही भक्तीगीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. भावना वैकर यांचे 'भरजरी ग पितांबर', स्नेहल क्षीरसागर यांचे 'मुझे तुम मिल गये', अनघा राऊत यांचे 'रुपेरी वाळूत', राजेश उपाध्ये यांचे 'सुख के सब साथी', सुभाष गर्जे यांचे 'विठू माऊली तू', मीनल संगमकर यांचे 'यशोमती मैया से' आणि डॉ.प्रकाश कांकरिया यांचे 'ए मालिक तेरे बंदे हम' या सदाबहार गीतांनी मैफिलीची रंगत वाढवली. मेहरबाबांचे निस्सीम भक्त नितीन थाडे यांनी सादर केलेले गोड भजन आणि जोशपूर्ण 'राजा ललकारी'मुळे संपूर्ण परिसर भक्तीरसात नाहून निघाला. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात देवदत्त पाऊलबुद्धे आणि ऋतुजा पाठक यांनी सादर केलेले 'धुंदी कळ्यांना' हे युगलगीत आणि सर्व सदस्यांच्या सुरात रंगलेला 'राग यमन' मैफिलीला एका वेगळ्याच उंचीवर घेऊन गेला.



बँकेचे भागधारक, खातेदार,ठेवीदार व हितचिंतक सर्वांना
दीपावली व नूतनवर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

नितीन भंडारी, मुख्य कार्यकारी अधिकारी | हस्तीमल मुनोत, संस्थापक चेअरमन व विद्यमान संचालक | अमित मुथा, व्हा.चेअरमन | संजय चोपडा, चेअरमन

संचालक मंडळ

अनिल पोखरणा, कमलेश भंडारी, आनंदराम मुनोत, संजय बोरा, किशोर गांधी, सीए आयपी अजय मुथा, सीए मोहन बरमेचा, किशोर मुनोत, संजीव गांधी, सुभाष बायड श्रीमती प्रमिलाबाई बोरा, श्रीमती मीनाताई मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, जितेंद्र बोरा (कर्मचारी प्रतिनिधी) * प्रसाद गांधी (कर्मचारी प्रतिनिधी)

बोर्ड ऑफ मॅनेजमेंट – सीएआयपी अजय मुथा (चेअरमन), किशोर मुनोत, राजेश झंवर, पेमराज बोथरा, सीए प्रवीण कटारिया

अहमदनगर मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. (शेड्यूल्ड बँक)

मर्चन्टस् बँक जेथे.. लक्ष्मी वास करी तेथे...

प्रधान कार्यालय : प्लॉट नं. ३३, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहिल्यानगर. फोन : ०२४१ -२३२२२२२

- व्यापारी व उद्योजकांसाठी नजर गहाण कर्ज
- एस.एस.आय. नजरगहाण कर्ज/टर्म लोन
- आडत कॅश क्रेडिट कर्ज

8.50% व्याजदर

- एम.एस.एम.ई. (मॅन्युफॅक्चर) कर्ज -

8.00% व्याजदर

- एस.एस.आय. मशिनरी कर्ज
- एस.एस.आय. बिल्डींग कर्ज

9.50% व्याजदर

- मशिनरी कर्ज

10.50% व्याजदर

दीपावली शुभचिंतन

ठेवीवरील आकर्षक व्याजदर

१ वर्षापेक्षा जास्त २ वर्षा पर्यंत 6.50%
ज्येष्ठ नागरिक 6.75%

* नियम व अटी लागू.

कार लोन 8% व्याजदर

हाऊसिंग लोन 6.50% व्याजदर

बँकेच्या विविध सुविधा – * नेट बँकींग * मोबाईल बँकींग * युपीआय * एटीएम * आरटीजीएस, एन.ई.एफ.टी. इ. सुविधा उपलब्ध...

शाखा : अ.नगर– दाळमंडई । मार्केट यार्ड । कापडबाजार । गुलमोहर रोड । चितळे रोड । एम.आय.डी.सी । तारकपुर जामखेड । छ.संभाजीनगर । पुणे । श्रीगोंदा । शेवगाव । पाथर्डी । सोनई । घोडनदी । कडा । छ.संभाजीनगर (मोंढा)। नारायणगाव



३७ वे पुण्यस्मरण

जगण्याचे बळ,
कुटुंबाचा पाया,
आधाराची छाया
माथ्यावरी...
स्मृतींचा दरवळ,
चंदनाची काया,
माऊलीची माया
गोदावरी...

स्व. लछमनदास राठोड
जन्म १९०३ स्व.धनत्रयोदशी १९८९

आपल्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण आदरांजली....!

दु:खांकित

संजय कुसुमबाई शिवशंकर राठोड
राठोड परिवार,
न्यू प्रभात बेकर्स अॅण्ड फूड प्रॉडक्टस्
सावेडी, अहिल्यानगर ,मो.९८२२००७७४०

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दि.०५/११/२०२६ ते दि.११/११/२०२६



RAMAYANA (हिंदी)

(3D)	7.00 AM I 10.45 AM I 02.30 PM 06.15 PM I 10.00 PM
(2D)	08.00 AM I 8.45 AM I 10.00 AM 11.45 AM I 12.30 PM I 01.45 PM 03.30 PM I 04.15 PM I 05.30 PM 07.15 PM I 08.00 PM I 09.15 PM 11.00 PM I 11.35 PM

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradise

book my show CONNPLEX book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

दीपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा

स्पेशल गुलाबजाम

गावराण तुपातील जिलेबी । चुरमा बुंदी लाडू । स्पेशल कंदी पेढे बेसन लाडू । खवा लाडू । लसून शेव चकली । बाकरवडी । करंजी । शंकरपाळे

घरगुती लक्ष्मीपुजनासाठी मिठाई बॉक्स

खास दीपावली करिता



गावरान तुपातील मिठाई मिळण्याचे एकमेव ठिकाण

बन्सी महाराज मिठाईवाले

रामचंद्र खुंट, अहिल्यानगर

9860939981, 9881761101

जैन सोशल फेडरेशन संचलित
वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंग, अहिल्यानगर
Govt of Maharashtra | MUHS Nashik | Maharashtra Nursing Council

INSTITUTE LEVEL ROUND 2026-27 B.Sc. Nursing अभ्यासक्रमासाठी संस्थास्तर फेरीचे वेळापत्रक

अ.क्र.	तपशील	दिनांक / कालावधी
1	संस्थेतील जागा वाटप व पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे	07/11/2026
2	पात्र इच्छुक उमेदवारांनी निर्धारित नमुन्यात अर्ज सादर करणे	08/11/2026 ते 10/11/2026 (सायं. 05.30 पर्यंत)
3	सर्वसाधारण गुणवत्ता यादी व प्रवर्गनिहाय यादी (Selection List-1) प्रसिद्ध करणे	10/11/2026 (सायं. 06.30 पर्यंत)
4	Selection List-1 दुसार उमेदवारांचा प्रवेश व कागदपत्र पडताळणी	11/11/2026 ते 12/11/2026 (साय. 05.30 पर्यंत)
5	Selection List-2 (प्रतीक्षा यादी) प्रसिद्ध करणे	12/11/2026 (सायं. 06.30 पर्यंत)
6	Selection List-2 दुसार प्रवेश व कागदपत्र पडताळणी	13/11/2026 ते 14/11/2026 (सायं. 05.30 पर्यंत)
7	उर्वरित रिक्त जागांची (Residual Vacancy) सूचना प्रसिद्ध करणे	14/11/2026 (सायं. 06.30 पर्यंत)
8	उर्वरित जागांसाठी पात्र उमेदवारांचा प्रवेश (मुक्त कागदपत्रांसह)	15/11/2026 (दुपारी 02.00 पर्यंत)
9	उर्वरित जागा भरणे (मेरिटनुसार)	15/11/2026 (दुपारी 03.00 पासून)
10	प्रवेशित उमेदवारांची माहिती (College Feedback Module)	15/11/2026
11	B.Sc. Nursing प्रवेशासाठी अंतिम दिनांक (INC नुसार)	15/11/2026

सुधारित पात्रता परसेंटाईल निकष / Revised Eligibility Percentile Criteria

पात्रता वर्ग	परसेंटाईल निकष (%)
खुला	0
खुला दिव्यांग	0
राखीव आणि राखीव दिव्यांग	0

Campus: 152/2 Nagar-Kalyan Road, Ganesh Nagar, Nalegaon, Ahilyanagar - 414001 | Mo: 7385502484
9527335317 | 02412971421 | Website: www.vmcn.edu.in

महाराष्ट्र राज्य सीईटी सेल यांच्या नियम व निकषानुसार प्रवेश दिले जाईल.

SONY



SPECIAL FESTIVE OFFERS*

3 YEARS WARRANTY*

INSTANT CASHBACK UP TO RS. 50,000/-^ ^Applicable on selected models

1 EMI FREE^ ^Applicable on selected models

TV + SOUNDBAR COMBO OFFER
SAVE UPTO Rs. 94,990/- | BUY NOW AT Rs. 2,995/-
*Conditions apply

BRAVIA

BRAVIA 7II NEW — XR Processor
The Future of Color is Here
SPECIAL OFFER* INSTANT CASHBACK UP TO Rs. 25,000/- Buy now @ Rs. 5,500/- per month
Google TV with Gemini — True RGB
Dolby VISION·ATMOS | RGB Backlight Master Drive Pro | RGB Triluminos Max | Luminance Booster
Available Sizes: • 248cm (98) • 215cm (85) • 189cm (75) • 164cm (65) • 139cm (55)
Range starts from Rs.2,21,990/-

BRAVIA 3II NEW — XR Processor
Fast Motion, True Color Brilliance.
SPECIAL OFFER* INSTANT CASHBACK UP TO Rs. 20,000/- Buy now @ Rs. 2,995/- per month
Google TV with Gemini
Dolby VISION·ATMOS | XR Triluminos Pro | SONY PICTURES CORE
Available Sizes: • 254cm (100) • 215cm (85) • 189cm (75) • 164cm (65) • 139cm (55)
Range starts from Rs.99,990/-

BRAVIA 2II — X1 4K Processor
Life, upscaled. In 4K.
SPECIAL OFFER* INSTANT CASHBACK UP TO Rs. 7,500/- Buy now @ Rs. 1,849/- per month
Google TV with Gemini
Dolby ATMOS | SONY PICTURES CORE | Features for PlayStation®5
Available Sizes: • 189cm (75) • 164cm (65) • 139cm (55) • 126cm (50) • 108cm (43)
Range starts from Rs.55,990/-

SOUNDBAR

A7100+SW8+RS8 NEW
BRAVIA Theatre Bar 7
GET Wireless Rear Speaker (SA-RS8) Rs.39,990/-*
SPECIAL OFFER* INSTANT CASHBACK UP TO Rs. 6,000/- Off BUY NOW AT UP TO Rs. 5,995/- Per Month
360 SPATIAL SOUND MAPPING | UPTO 24 PHANTOM SPEAKER | Dolby ATMOS | IMAX ENHANCED
~~MRP Rs. 1,87,970/-~~ Offer Price Rs. 99,980/-

BRAVIA Theatre System 6
Real 5.1ch Dolby Atmos Soundbar with Wireless Rear Speaker
SPECIAL OFFER* INSTANT CASHBACK UP TO Rs. 2,000/- Off BUY NOW AT UP TO Rs. 2,995/- Per Month
Dolby ATMOS | 1000w POWER OUTPUT | WIRELESS Rear Speakers | S-FORCE PRO FRONT SURROUND
~~MRP Rs. 64,990/-~~ Offer Price Rs. 47,990/-

HT-B500 NEW
3.1ch. Soundbar with Wireless Subwoofer
SPECIAL OFFER* INSTANT CASHBACK UP TO Rs. 2,790/- Off BUY NOW AT UP TO Rs. 1,749/- Per Month
Dolby ATMOS | dts X | Wireless Subwoofer | 250 W
~~MRP Rs. 37,990/-~~ Offer Price Rs. 27,990/-

HT-S40R
Real 5.1ch soundbar with wireless rear speakers
SPECIAL OFFER* INSTANT CASHBACK UP TO Rs. 2,000/- Off BUY NOW AT UP TO Rs. 1,499/- Per Month
Wireless Rear Speakers | Total Output Power 600 RMS | s-master Digital Amplifier | Dolby AUDIO
~~MRP Rs. 34,990/-~~ BEST BUY Rs. 22,990/-

Bank Card Offers Powered by : pine labs | paytm
ATTRACTIVE CREDIT CARDS FINANCE OPTIONS* — HDFC BANK | SBI card | AXIS BANK | IDFC FIRST Bank | Federal Bank | HSBC | IDFC FIRST Bank | J&K Bank | kotak | YES BANK
ATTRACTIVE PAPER FINANCE OPTIONS* — BAJAJ FINANCE | IDFC FIRST Bank CONSUMER DURABLE LOAN | HDB FINANCIAL SERVICES

Regd. Office: Sony India Pvt. Ltd., A-18, Mohan Co-operative Indl. Estate, Mathura Road, New Delhi-110 044. Ph: 6600 6600 Fax: 26959141 Customer Care No.: 080-6500 6500 CIN No : U74899DL1994PTC062781. For corporate enquiries, please email at b2bindia@ap.sony.com

*T&C apply. Features & prices may vary for each product. For more details please visit: www.sony.co.in; Special Offers Applicable on select products in select cities for limited period only. For details of terms & Conditions on offers please visit https://www.sony.co.in/microsite/festive-tnc/ BRAVIA Quest, the annual TV Shootout evaluation event is conducted by Value Electronics and the TV Shootout name is a trademark owned by Value Electronics. King of TV® a trademark owned by Value Electronics.

SONY CENTER - Biggest Showroom
Delhigate, Ahilyanagar.
Cell :- 9890000234 / 9890000093